# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०१६ / फाल्गुन २१, १९३७ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**<br>**(२) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री**<br>**(३) जलसंपदा मंत्री**<br>**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १०८**

---

### राज्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत जलयुक्त शिवार योजनेसाठी देण्यात आलेले धनादेश बनावट असल्याबाबत

**(१) * १४७५५ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.अनिल परब, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत जलयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी अनेक व्यक्तींनी व संस्थांनी शासनाला देणगी स्वरुपात धनादेश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातील अनेक धनादेश बँकेत न वटल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामधील काही धनादेश संबंधित खात्यांमध्ये योग्य रक्कम नसल्याने वटले गेले नाहीत तर काही धनादेश वटवण्यापूर्वीच ते वटवले जाऊ नयेत असे बँकांना लेखी कळविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त देणगीदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे. जलयुक्त शिवार योजनेचे एकूण २८ धनादेश स्टेट बँक ऑफ इंडिया यांचेकडून परत आले आहेत.

(४) सदर देणगी स्वेच्छेने देण्यात आली असल्याने, कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही. संबंधित देणगीदारांना धनादेश न वटण्याची कारणे कळविण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाची विविध महामंडळे, देना बँकेतील व इतर राष्ट्रीयकृत बॅकेतील मुदत ठेवींवरील रकमेचा अपहार झाल्याबाबत**

**(२) * १५२८७ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.मितेश भांगडिया, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.महादेव जानकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती स्मिता वाघ, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाची विविध महामंडळे आणि प्राधिकरणांच्या जवळपास ३५० कोटी रुपयांच्या देना बँकेतील व इतर राष्ट्रीयकृत बँकेतील मुदत ठेवींवर बनावट पावत्या बनवून कोट्यवधी रुपयांचे कॅश क्रेडिट बिल्डरांसह उद्योगपतीं यांना देण्याचा प्रकार दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्य शासनाच्या एमएमआरडीए, महिला आर्थिक विकास मंडळ, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मकार विकास महामंडळ (लिडकॉम) व पर्यटक विकास महामंडळासह किमान १० महामंडळाने आणि प्राधिकरणांने जवळपास ३५० कोटी रुपयांच्या ठेवीवर बनावट क्रेडिट देवून बँकेचे अधिकारी आणि दलालांच्या संगनमतातून महामंडळांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास राज्यात शासनाच्या महामंडळाव्यतिरिक्त बड्या कंपन्या व संस्थांना मुदत ठेव (एफ.डी) गैरव्यवहारात किमान १००० कोटी रुपयांहून अधिक रकमेला फसविले असल्याचे उघडकीस येऊन यामध्ये काही दलाल, बँकांचे वित्तीय सल्लागार तसेच काही अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गैरव्यवहार बँकेचे अधिकारी आणि दलालांच्या संगनमतातून झाल्याचेही निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, यामध्ये राज्य शासनाच्या कोणकोणत्या महामंडळांच्या किती रकमेच्या मुदत ठेवी (एफ.डी.) चा अपहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, सदर महामंडळांचे अध्यक्ष, संचालक मंडळ व अधिकारी यामध्ये सामिल असल्याबाबतचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : (१) व (२) हे अंशत: खरे आहे, जुलै, २०१४ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ यांनी देना बँकेत आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ यांनी विजया बँक येथे गुंतविलेल्या मुदतीठेवीवरील एकूण रु. १४३.१५ कोटी इतक्या रक्कमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

तथापि, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या निधीसंदर्भात कोणताही अपहार झाल्याचे आढळून आलेले नाही.

देना बँकेच्या कर्मचाऱ्यांविरुध्द सी.बी.आय. ने जून, २०१५ मध्ये विशेष न्यायाधीश, बृहन्मुंबई येथे आरोपपत्र दाखल केले असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.विजया बँकेसंदर्भात आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेमार्फत तपास सुरु आहे.

(३) व (४) होय हे अंशत: खरे आहे, सदर गुन्हयामध्ये एजंन्ट, लाभार्थी आणि संबंधीत बँक अधिकाऱ्यांना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाबाबत तपास सुरु आहे.

(५) व (६)

| अ.क्र. | सार्वजनिक उपक्रमाचे नाव | मुदत ठेवीवरील अपहार झालेली रक्कम |
|---|---|---|
| १. | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, | रु. ४५.२३ कोटी |
| २. | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, | रु. ६४.०९ कोटी |
| ३. | महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, | रु. २५.७३ कोटी |
| ४. | संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ | रु. ८.१० कोटी |
| | **एकूण** | **रु. १४३.१५ कोटी** |

वर नमूद केल्याप्रमाणे राज्य सार्वजनिक उपक्रमांनी गुंतविलेल्या मुदतीठेवीवरील एकूण रु. १४३.१५ कोटी इतक्या रक्कमेचा उपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर गुन्हयामध्ये एजंन्ट, लाभार्थी आणि संबंधीत बँक अधिकाऱ्यांना अटक करण्यात आलेली असून त्यांचेविरुध्द विशेष न्यायाधीश बृन्हमुंबई येथे आरोप पत्र दाखल केले आहे. तसेच यासंदर्भात सी.बी.आय. व आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेमार्फत तपास सुरु आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**राज्यात शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(३) * १५१७९ श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार, श्री.रामनाथ मोते, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११९८१ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पती-पत्नी एकत्रिकरण करण्यासाठी व त्यांचे कौटुंबिक जीवन सुखद होण्यासाठी शासनाने पती-पत्नी एकत्रिकरण योजना आखून आंतरजिल्हा बदली धोरण मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लग्नानंतर किंवा लग्नापूर्वी वेगवेगळ्या जिल्ह्यात तसेच आदिवासी जिल्ह्यांमध्ये कार्यरत शिक्षकांनी आंतरजिल्हा बदलीसाठी विहित नमुन्यात अर्ज केल्यानंतरही वर्षानुवर्ष (५ ते १० वर्ष) पर्यंत त्यांना आंतरजिल्हा बदली देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंतरजिल्हा बदली न मिळाल्यामुळे अशा शिक्षकांचे कौटुंबिक जीवन दु:खमय होऊन अनेक समस्या निर्माण होतात, हे खरे आहे काय,

(४) तसेच शिक्षक (आंतरजिल्हा बदली) सहकार कृती समिती, महाराष्ट्र राज्य या संघटनेतर्फे बदलीग्रस्त शिक्षकांच्या मागण्या मांडण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(५) तसेच पती-पत्नी एकत्रिकरणाच्या धोरणानुसार जिल्हा परिषदेतील शिक्षकांचे आंतरजिल्हा बदलीसंबंधिचे प्रलंबित प्रस्तावाबाबत शासनस्तरावरून माहिती संकलित करण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, पती-पत्नी एकत्रिकरणाचे एकूण प्रलंबित प्रस्तावांची संख्या किती आहे व यापैकी किती प्रस्तावांना मंजुरी देण्यांत आली आहे,

(७) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) आंतरजिल्हा बदली ही विनंती बदली असून ती दोन जिल्हा परिषदांमधील कार्यवाहीची बाब आहे. राज्य शासनाच्या धोरणानुसार पती पत्नी एकत्रिकरणासाठी संबंधित जिल्हापरिषदेमध्ये ३ वर्षाचा कार्यकाल पूर्ण केल्यानंतर आंतरजिल्हा बदलीस पात्र होतात. तद्नंतर अशा बदलीचे प्रस्ताव तपासताना संबंधित जिल्ह्यातील शाळांची संख्या, या शाळांमधील विद्यार्थी संख्या, सदर

शाळांमध्ये संबंधित शिक्षकांच्या नियुक्ती प्रवर्गाचे पद उपलब्ध असणे, प्राधान्यक्रम, संबंधित जिल्हा परिषदेची प्रतिक्षायादी या बाबी विचारात घ्याव्या लागतात.

(४) होय.

(५) व (६) होय, पती पत्नी एकत्रिकरणांतर्गत सकृतदर्शनी एकूण ४५०९ प्रस्ताव प्रलंबित आहेत. मात्र या बदली प्रस्तावास शासनातर्फे मंजुरी देण्यात येत नाही, तो निर्णय जिल्हापरिषद स्तरावर आपआपसातील सहसमतीने घेतला जातो.

(७) व (८) शिक्षकांच्या बदल्या संदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून धोरणात्मक निर्णय घेण्यात येत असून त्यानुसार संगणक प्रणाली विकसित करण्याची बाब त्या विभागाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**नार, पार, अंबिका, औरंगा नदी खोऱ्यातील २०० मीटर उपसा उंचीच्या मर्यादेत उपलब्ध होणारे पाणी गिरणा खोऱ्यात वळविण्याबाबत**

**(४) * १४५८४ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १२६९० ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नार, पार, अंबिका, औरंगा नदी खोऱ्यातील २०० मीटर उपसा उंचीच्या मर्यादेत उपलब्ध होणारे पाणी गिरणा खोऱ्यात वळविणेसंबंधिच्या विचाराधीन बाबींवर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(२) दमणगंगा, पिंजाळ, नार-पार, तापी, नर्मदा या प्रकल्पातील उर्वरित पाणी उपसा सिंचनाद्वारे अनुक्रमे गोदावरी व तापी खोऱ्यात वळवून अवर्षण पिडीत भागास उपलब्ध करून देणेबाबत निर्णय घेण्याचे प्रस्तावित होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु प्रकल्पास राष्ट्रीय प्रकल्प घोषित करणेबाबतचा निर्णय घेण्यांत आला आहे काय,

(४) असल्यास, नार, पार, औरंगा व अंबिका या चार खोऱ्यातील पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी पुर्वेकडे तापी खोऱ्यात वळविण्यासाठी योजनेचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी लागणाऱ्या खर्चास दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, पश्चिमेकडे अरबी समुद्रास वाहून जाणारे पाणी पुर्वेकडे गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी ६ प्रवाही वळण योजनांची कामे भौतिकदृष्ट्या पुर्ण, ११ प्रवाही वळण योजनांची कामे विविध टप्प्यावर प्रगतीपथावर, ३ प्रवाही वळण योजनांना तत्वत: मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन, ३ प्रवाही योजनांची कामे स्थानिकस्तर मार्फत प्रगतीपथावर आणि ७ प्रवाही वळण योजनांची कामे अत्यंत प्राथमिक अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, एकदरे (दमणगंगा) ते गोदावरी खोरे या नदीजोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची विनंती राज्य शासनाने राष्ट्रीय जलविकास अभिकरण यांना दिनांक १२ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) होय.

(३) याबाबत राज्य शासनाने मा.केंद्रीय जलसंसाधन मंत्री यांचे अध्यक्षतेखालील नदीजोड प्रकल्पाच्या विशेष समितीच्या बैठकीत मागणी केलेली आहे.

(४) होय.

(५) होय.

(६) होय.

(७) एकदरे (दमणगंगा) ते गोदावरी खोरे या नदीजोड योजनेबाबत राज्यशासनाने मा.केंद्रीय जलसंसाधन मंत्री यांचे अध्यक्षतेखाली नदीजोड प्रकल्पाच्या विशेष समितीच्या दिनांक १४/५/२०१५ रोजीच्या बैठकीत मागणी केलेली आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदनगर, जळगांव, अमरावती आणि नंदुरबार या चार जिल्हयाच्या आदिवासी विभागातील शाळांमध्ये निकृष्ट चिक्कीचा पुरवठा झाल्याबाबत**

**(५) * १४७२१ श्री.संजय दत्त, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला व बाल विकास मंत्रालयामध्ये २०६ कोटींच्या योजनेअंतर्गत अहमदनगर, जळगांव, अमरावती आणि नंदूरबार या चार जिल्हयाच्या आदिवासी विभागातील शाळांमध्ये वितरीत केलेली चिक्की खाण्यायोग्य नव्हती अशी कबुली शासनाने मा.मुंबई उच्च न्यायालयाकडे दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट चिक्कीचा पुरवठा करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्यात वाटप करण्यात आलेल्या चिक्कीबाबत अहमदनगर, जळगांव, अमरावती आणि नंदूरबार या चार जिल्हयात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रार प्राप्त चिक्कीचा पुरवठा बदलून घेणे. संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून चौकशी अहवाल मागविणे, तक्रार प्राप्त चिक्कीचे नमुने घेऊन शासकीय प्रयोगशाळा / NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळा यांचेकडे तपासणीसाठी पाठविणे व संबंधित तपासणी अहवाल प्राप्त करणे इ. बाबतची कार्यवाही वेळोवेळी करण्यात आलेली आहे.

अहमदनगर जिल्हयातील प्रकल्प कार्यालयातून F.D.A. ने राजगिरा चिक्कीचे नमुने घेवून राज्य प्रयोगशाळा पुणे यांचेकडे तपासणीसाठी पाठविले होते. त्यांचेकडून चिक्की खाण्यास योग्य नसल्याचा अहवाल प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने संबंधित पुरवठाधारक संस्थेस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. सदर संस्थेने F.D.A. कडे रेफरल लॅब मार्फत पुन्हा नमुने तपासणीसाठी अपील केले होते. संस्थेच्या अपील अर्जानुसार FDA ने राजगिरी चिक्कीचे नमुने गाजियाबाद येथे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्याचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालानुसार तीन नमुन्यापैकी दोन नमूने अन्न सुरक्षा मानके (पॅकेजिंग व लेबलिंग) नियमन-२०११ चे उल्लघंन झाल्यामुळे

मिथ्थाछाप (Misbranded) घोषित केले आहे व एक नमूना प्रमाणित घोषित केला आहे. तसेच दि. १०/०७/२०१५ च्या पत्रान्वये आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी राजगिरा चिक्कीचा यापुढील पुरवठा आजपासून तात्काळ थांबविण्यात यावा, असे पुरवठादार संस्थेस कळवून तशा सूचना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)/ बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना दिलेल्या आहेत.

-----------------

**गोवर्धन आयुफार्मा या कंपनीत बिस्कीट उत्पादनात अनेक बेकायदेशीर गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(६) * १५७५५ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक १११७१ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवर्धन आयुफार्मा या कंपनीला महिला व बालकल्याण विभागाकडून बिस्कीटे बनविण्यासाठी ५ कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आले, परंतु या कंपनीकडे सन २०१३ पासून एफडीए ची मान्यता नसल्याचे तसेच सदर बिस्कीटे खाण्यासाठी उपयुक्त आहेत असे कोणतेही अधिकृत मानकांकडून प्रमाणित करण्यात आल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याचे तसेच या बिस्कीट उत्पादनात अनेक बेकायदेशीर गैरव्यवहार असल्याचे दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाचे सह आयुक्त यांनी छापे टाकून सदर उत्पादित झालेली बेकायदेशीर बिस्कीटे ताब्यात घेतली असून त्याचा अहवाल त्यांनी शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, अहवालात नमुद करण्यात आलेल्या प्रमुख बाबी कोणत्या,

(४) तसेच वरील प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना मे.गोवर्धन आयुफार्मा प्रा.लि.पुणे यांचेकडून आयुर्वेदिक बिस्किटांचा पुरवठा करण्यासाठी रु. ५ कोटी इतक्या कमाल मर्यादेपर्यंतच्या खर्चास दि. १३/०२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

मे.गोवर्धन आयुफार्मा प्रा.लि.यांनी अन्न व औषध प्रशासनाचा दि. २१/०४/२००९ ते दि. ३१/१२/२०१३ या कालावधीत वैधता असलेला गोवर्धन शक्तीवर्धक आहार कल्पे व गोवर्धन शक्तीवर्धक बिस्कीटे १,२,३,४,५ (प्रोप्रायटरी फुड) उत्पादन व विक्री याचा परवाना घेतलेला आहे. त्यानुसार अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ नुसार अन्न व औषध प्रशासनाचा दि. २१/०४/२००९ ते ३१/१२/२०१३ या कालावधीत वैधता असलेल्या परवान्यास विधाग्राहयता व नुतनीकरणानुसार दि. ३१/१२/२०१३ पासून पुढे ५ वर्ष परवाना परिवर्तन करुन घेतलेला आहे.

(२), (३) व (४) अशा प्रकारचा अहवाल या विभागास प्राप्त झालेला नाही. तथापि Food Safety & Standard authority of India (FSSAI) नवी दिल्ली यांचेकडून अन्न पदार्थासाठी मान्यता तसेच ना-हरकत प्रमाणपत्र नसल्यामुळे FSSAI कडून प्रमाणपत्र मिळेपर्यंत सदर संस्थेने वितरीत करण्यात आलेले सर्व प्रकारची उत्पादने परत मागवून घेऊन ती उत्पादकाकडे परत पाठविण्यात यावी तसेच प्रमाणपत्र मिळाल्यानंतर वितरण/पुरवठा करण्याचे आदेश व्हावेत, असे अन्न व औषध प्रशासन विभागाने दि. २९/०७/२०१५ च्या पत्रान्वये आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना कळविले आहे. सदरचे पत्र आयुक्त कार्यालयास माहे ऑगस्ट,२०१५ मध्ये प्राप्त झाले. तथापि आयुक्त कार्यालयाचे पुरवठा आदेशानुसार दि. १३/०४/२०१५ पर्यत बिस्किटांचे लाभार्थ्यांना वाटप होवून त्याचा विनीयोग झालेला असल्याने ती परत घेता आले नाही. मात्र सदर बिस्किटांची NABL मान्यता प्राप्त लॅबकडून तपासणी करण्यात आली असून सदर अहवालामध्ये बिस्किटांमधील मानके बरोबर असल्याचे नमूद आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नंदूरबार शहरात एम.एस.आर.डी.सी. प्रकल्प अंतर्गत**
**डिझेल व पेट्रोलवर लावलेला सेस रद्द करण्याबाबत**

**(७) * १६१२९ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार शहरात एम.एस.आर.डी.सी. प्रकल्प अंतर्गत डिझेल व पेट्रोलवर लावलेला सेस रद्द न होण्याची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, याबाबत मागील अधिवेशनात आश्वासन देऊनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी जिल्ह्याला सेसपासून किती दिवसात रद्द करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दिनांक ११.०८.२००३ च्या शासन निर्णयानुसार नंदूरबार शहरातील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी रस्ते व पुलांच्या कामाकरिता एमएसआरडीसी यांना उद्योजक घोषित करण्यात आले व त्याची या संबंधातला खर्च वसूल करण्याकरिता डिझेल व पेट्रोल लावलेला जादा अधिभारापोटी जमा होणारा निधी देण्याचे ठरविण्यात आले. त्या निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक १ जून, २०१२ पासून अधिभार लावण्यात आला आहे. उल्लेखित उद्देश लक्षात घेता जादा अधिभार रद्द करण्यात येऊ शकत नाही.

(२) खरे नाही, या संदर्भात कोणतेही आश्वासन दिलेले नाही.

(३) अशी बाब नाही.

(४) नंदुरबार शहर एकात्मक रस्ते विकास योजनेची वित्तीय आखणी सर्वसाधारणपणे वर्धनक्षम होण्याच्या दृष्टिने पेट्रोल व डिझेलवर अधिभार लावण्यात आला आहे. त्यामुळे अधिभार रद्द करता येत नाही.

-----------------

**महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरीचे दर वाढविण्याबाबत**

**(८) * १५९९२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत सध्या मजुरांना प्रतिदिन १८१ रुपये मजुरी दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महागाई वाढल्यामुळे महागाईच्या प्रमाणात रोहयो मजुरीचे दर वाढले नाहीत, दुष्काळग्रस्त भागातील मजुरांना किमान ३०० रुपये प्रतिदिन मजुरीची रक्कम करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळग्रस्त भागात शेतकरी, कष्टकरी, मजुर यांना दिलासा देण्यासाठी मग्रारोहयो अंतर्गत मजुरीचे दर वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) महात्मा गांधी नरेगा ही योजना केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात राबविली जाते. केंद्र शासन प्रत्येक राज्यासाठी दरवर्षी मजुरी दर निश्चित करत असते. त्याप्रमाणे सन २०१५-१६ या वर्षासाठी महाराष्ट्राकरिता रु. १८१/- इतका मजुरी दर केंद्र शासनाने निश्चित केलेला आहे. ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बाब आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुण्यातील येरवडा मनोरुग्णालयातील वॉशिंग मशिन बंद पडल्याबाबत**

**(९) * १५७६५ अॅड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील येरवडा मनोरुग्णालयातील वॉशिंग मशिन बंद पडल्याने काही कपडे मनोरुग्णांना धुवावे लागत असल्याने त्यांचे हाल होत आहेत तर काही कपडे धुण्यासाठी ठेकेदारांची नियुक्ती केल्याने शासनाला लाखो रुपयांचा भुर्दंड पडत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार येरवडा रुग्णालयातील मनोरुग्णांना स्वत:चे कपडे स्वत: धुवावे लागु नयेत तसेच ठेकेदारांकडून कपडे धुवून घेऊन शासनाचे लाखो रुपयांचे होणारे नुकसान टाळण्याबाबत शासनाने नवीन वॉशिंग मशीन खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे. मनोरुग्णालयातील वॉशिग मशिन मधील विद्युत उपयंत्रामध्ये उच्च दाब वीज पुरवठ्यातील चढ उतारामुळे दिनांक १४.११.२०१५ ते दिनांक ३१.१२.२०१५ या कालावधीत सदर मशीन बंद पडली होती. या कालावधीकरिता स्थानिक बाजारातून दरपत्रके मागवून सर्वात कमी दर असलेल्या ठेकेदारामार्फत रुग्णांचे कपडे धुवून घेतले. त्याकरिता रुपये ७८,०००/- हजार इतका खर्च आला आहे. त्यामुळे कपडे धुण्यासाठी लाखो रुपयांचा भुर्दंड पडल्याचे तसेच मनोरुग्णांकडून कपडे धुवून घेतले हे खरे नाही. वॉशिंग मशिन पुरवठादार कंपनीने वॉशिंग मशिन दुरूस्त करुन दिली असून ती दिनांक ३१.१२.२०१५ पासून कार्यान्वित झालेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार (जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील क्ष किरण मशिन ४ वर्षापासून बंद असल्याबाबत

**(१०) * १५७२० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील क्ष किरण मशिन गेल्या ४ वर्षापासून बंद स्थितीत असल्यामुळे तेथील नागरिकांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, क्ष किरण यंत्र बंद असल्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच या संस्थांना त्वरीत अनुदान मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १७.७.२००७ रोजी वाय.के.चॅरीटेबल ट्रस्ट यांचेकडून प्राथमिक आरोग्य केंद्र नवघर येथे क्ष-किरण मशिन “दान” स्वरुपात देण्यात आली होती. त्या काळात मानधनावर कंत्राटी क्ष-किरण तंत्रज्ञानाद्वारे रुग्णांना क्ष-किरण उपचाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती.

आरोग्य संस्थांच्या मार्गदर्शक निकषानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर क्ष-किरण मशिन अनुज्ञेय नाही. त्यामुळे तेथे क्ष-किरण तंत्रज्ञ हे पद मंजूर नाही. तसेच सद्या कंत्राटी तंत्रज्ञ उपलब्ध होत नसल्याने, सदर मशिन बंद आहे.

तथापि, येथील नागरीकांना आवश्यकतेनुसार क्ष-किरण उपचाराची सोय इतर शासकीय रुग्णालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात येते.

(४) क्ष-किरण यंत्र प्राथमिक आरोग्य केंद्रास अनुज्ञेय नसल्याने त्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## गोलंग्री व शिवणी (जि.बीड) येथे मग्रारोहयो अंतर्गत विहिरी, रस्त्यांच्या कामात अपहार झाल्याबाबत

**(११) * १६१८२ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोलंग्री व शिवणी (जि.बीड) येथे मग्रारोहयो अंतर्गत विहिरी, रस्त्यांच्या कामात अपहार झाल्याच्या तक्रारी वरुन ग्रामसेविका, ग्रामरोजगार सेवक, तांत्रिक अधिकारी यांच्यावर निलंबनाची कारवाई केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अधिका-यांनी या बोगस तुळजाई डेव्हलपर्स, जय हनुमान ड्रिलींग कॉंट्रक्टर या एजन्सी दाखविल्या होत्या त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाची फसवणूक केल्यामुळे ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच अधिकारी, जि.प. चे अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

(२) व (३) सदर एजन्सीच्या कामाचा निधी रु.१,७४,८००/- ग्रामपंचायत मौजे शिवणी यांच्या खात्यावर शिल्लक असून तो संबंधित एजन्सीला वाटप करण्यात आला नाही. सदर निधी वितरीत न करण्याच्या सूचना ग्रामपंचायत शिवणीला दिल्या आहेत.

सदर प्रकरणी दोषी संबंधितांविरुध्द खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

(अ) ग्रामपंचायत गोलग्री -

(१) संबंधित ग्रामरोजगार सेवक, तांत्रिक अधिकारी व लाभार्थी यांच्यावर नेकनूर पोलीस ठाणे जि.बीड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे व तांत्रिक अधिकारी यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे.

(२) संबंधित तलाठी, गोलग्री यांच्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) संबंधित ग्रामसेवक, कनिष्ठ अभियंता, उप अभियंता, हजेरी सहाय्यक, लेखाधिकारी, कनिष्ठ सहाय्यक यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे.

(४) सरपंच, गोलग्री, यांच्याविरुध्द मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अंतर्गत कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

(ब) ग्रामपंचायत शिवणी -

(१) संबंधित ग्रामरोजगार सेवक, तांत्रिक अधिकारी (कंत्राटी) यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

(२) संबंधित ग्रामसेविकेस निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बालगृहे, निरीक्षणगृहे व अनाथालयास भोजन अनुदान इमारत भाडे तसेच कर्मचाऱ्यांना वेतन देण्याबाबत

**(१२) * १६२४८ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.धनंजय मुंडे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश गजभिये, श्री.महादेव जानकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.नागो गाणार, श्री.जयंत पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागाच्या मान्यतेने राज्यात ९९६ बालकाश्रम, बालसदन व अनाथालये मधील वास्तव्य करणाऱ्या ८० हजार अनाथ निराश्रीत बालकांना देण्यात येणाऱ्या भोजनाचे सुमारे २०० ते २३६ कोटीचे अनुदान तसेच त्यांचा सांभाळ करणाऱ्या १० हजार पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना शासनाने निधी दिला नसल्याने गेल्या तीन वर्षांपासून वेतन न मिळाल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच बालगृहांचे अनुदान थांबविल्याने राज्यातील २१५ बालगृहे कायमची बंद करण्याचे निदेश महिला व बालकल्याण विभागाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा दरम्यान दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मुंबईतील मानखुर्द येथील बालगृहातील कर्मचाऱ्यांना मागील दोन महिन्यांपासून व राज्यातील ४४ बालगृहातील/निरिक्षण गृहातील कर्मचाऱ्यांना माहे जुलै, २०१५ पासून वेतन मिळाले नसल्याची बाब जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.ग्रामविकास मंत्री यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ रोजी भोजन अनुदान, इमारत भाडे व कर्मचारी वेतन अदा करण्याचा आदेश देऊनही तसेच माहे जुलै-ऑगस्ट, २०१५ मध्ये उपजिल्हाधिकारी स्तराच्या अधिकाऱ्यांच्या पथकामार्फत सखोल तपासणी मोहीम करुनही सदर भोजन अनुदान, इमारत भाडे, कर्मचारी वेतन संबंधित संस्थांना देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील ४४ बालगृहातील/निरिक्षण गृहातील कर्मचाऱ्यांनी ८ महिन्यांचे थकित वेतन, कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा, दरमहा सेवार्थ अथवा बी.डी.एस. मार्फत वेतन व भविष्य निर्वाह निधीची रक्कम नियमित भरण्याच्या मागणीसाठी दिनांक २६ जानेवारी २०१६ रोजी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, दिनांक १३ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयानुसार उक्त बालगृहांची तपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(७) तसेच अपु-या सुविधा देणा-या बालगृहांची रवानगी ब आणि क वर्गामध्ये झाली असून त्यांना राज्य शासनाकडून अनुदान नाकारण्याची कारवाई केली जाणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(८) असल्यास, त्यानुसार किती बालगृहांना अ दर्जा मिळालेला आहे,

(९) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(१०) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात ९९६ बालगृहे नसून स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणारी ९९४ अनुदानित बालगृहे आहेत. यांचे पुर्वीचे प्रलंबित व चालू वर्षाचे अनुदान अदा करण्यासाठी एकुण रु.१७२.६८ कोटी एवढ्या तरतूदीची आवश्यकता आहे. तथापि, २०१५-२०१६ या चालू आर्थिक वर्षात रु.११.३६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. याशिवाय रु. ७.३८ कोटी इतका निधी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करण्यात येऊन संबंधितांना वितरीत करण्यात आला आहे. तसेच, उर्वरित आवश्यक असलेल्या रक्कमेसाठी रु.१५६.४४ कोटी एवढ्या रक्कमेचा

पुरवणी मागणी प्रस्ताव नियोजन विभाग व वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे.

त्याचप्रमाणे शासन स्वयंसेवी संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी शासनाकडून निधी देण्याची तरतूद नाही. तथापि, शासन स्वयंसेवी संस्थेतील प्रति प्रवेशितांसाठी दरमहा रु.३१५/- इतके सहाय्यक अनुदान इतर प्रशासकीय खर्चासाठी देते.

(२) हे खरे नाही.

शासन निर्णय क्र.बालगृ-२०१५/प्र.क्र.५०/का.-८, मुंबई दिनांक १३ जुलै, २०१५ अन्वये बालगृहांच्या वर्गीकरणाबाबत तपासण्या करण्यात आलेल्या असून सदर तपासणीमध्ये २१४ बालगृहे मुल्यांकनामध्ये “क” व “क पेक्षा कमी” वर्गात आढळून आलेले असल्याने त्यांच्या मान्यता रद्द करण्याबाबत प्रस्तावित आहे. तथापि, सदर तपासणी विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल झाल्या असून मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर तपासणीचा एकत्रित अहवाल व शासनाकडून प्रस्तावित कार्यवाही मा.न्यायालयास सादर करण्याची कार्यवाही सुरू असून सदर बालगृहे बंद करण्याचे आदेश अद्याप शासनामार्फत देण्यात आले नसून सद्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) होय, हे खरे आहे.

मात्र, मुंबईतील मानखुर्द येथील बालगृहातील कर्मचाऱ्यांचे व निरीक्षणगृहातील कर्मचाऱ्यांचे वेतन या प्रयोजनासाठी सन २०१५-२०१६ या चालू आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित करण्यात आलेला निधी शासनस्तरावरुन संबंधितांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(४) हे, अंशत: खरे आहे.

बालगृहांच्या वर्गीकरणाबाबत तपासण्या करण्यात आलेल्या असून थकित अनुदान उपलब्ध होण्यासाठी रु.१५६.४४ कोटी पुरवणी मागणी प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे.

(५) उपोषण केले ही बाब खरी आहे मात्र, निरीक्षणागृहातील कर्मचाऱ्यांसाठी सन २०१५-२०१६ या चालू आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित करण्यात आलेला रु.५.९५ कोटी इतका निधी शासनस्तरावरुन उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(६) दिनांक १३ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयानुसार उक्त बालगृहाची तपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे हे खरे आहे.

(७) याबाबत बालगृहांच्या तपासण्या करण्यात आलेल्या असून बालगृहांचे वर्गीकरण “अ”, “ब” व “क” श्रेणीमध्ये करण्यात आले असून सदर बाब न्यायप्रविष्ट असल्याने याबाबतची पुढील कार्यवाही मा.न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन आहे.

(८) आतापर्यंत ४७६ बालगृहांना “अ” दर्जा मिळालेला आहे.

(९) सदर बाब न्यायप्रविष्ट आहे.

(१०) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील उमा बॅरेज प्रकल्प, घुंगशी बॅरेज मध्यम प्रकल्प आणि काटेपूर्णा बॅरेज हया तीन प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१३) * १५१३५ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ७३८३ ला दिनांक १४ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील खारपाणपट्टयासाठी महत्वपूर्ण असलेल्या उमा बॅरेज प्रकल्प, घुंगशी बॅरेज मध्यम प्रकल्प आणि काटेपूर्णा बॅरेज हया तीन प्रकल्पाचे काम गेल्या सात वर्षापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम बंद असतांनाही मागील सव्वा वर्षापासून केवळ दंडाची रक्कम कपात करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोटयवधी रुपये खर्च करुनही शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहचत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या तिन्ही प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर खारपाणपट्टयातील काही गावांसह मूर्तिजापूर तालुक्यातील एकूण १६ हजार ४.३ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू काम प्रलंबित राहिल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: हे खरे आहे.

अकोला जिल्हयातील खारपाणपट्टयातील उमा बॅरेज, घुंगशी व काटेपुर्णा बॅरेज या तीन प्रकल्पांपैकी घुंगशी व काटेपुर्णा बॅरेज या प्रकल्पांची कामे प्रगतीत आहेत. उमा बॅरेज या प्रकल्पाच्या बॅरेजचे सर्वसाधारणपणे ५० टक्के काम पुर्ण झाले असून कंत्राटदाराने जून, २०१२ पासून काम बंद ठेवलेले आहे.

(२) उमा बॅरेजचे कामाची प्रगती समाधानकारक नसल्याने संबंधित कंत्राटदारावर करारातील तरतुदीनुसार दि. ०७/११/२०१४ पासून दंडनीय कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(३) होय.

(४) सदर तीन प्रकल्पांद्वारे अकोला जिल्हयातील एकुण १५,९९० हे क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

(५) क्षेत्रीय स्तरावरुन सदर कामाचा नियमित आढावा घेण्यात येतो.

(६) घुंगशी व काटेपुर्णा बॅरेज पुर्ततेबाबत पाठपुरावा सुरु आहे. उमा बॅरेज बाबत कंत्राटदारावर दंडनीय कार्यवाही सुरु केली आहे. कंत्राटातील तरतुदीनुसार आवश्यक ठरलेस सुरक्षा अनामत जप्त करुन नवीन निविदा मागविण्यात येतील.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ग्रामपंचायत स्तरावरील संगणक परिचालकास पुन्हा शासन सेवेत घेऊन त्यांचे थकित मानधन देण्याबाबत**

**(१४) * १४९६० डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.जयंत पाटील, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाऑनलाईनच्या माध्यमातून ग्रामपंचायत स्तरावर विविध २७ प्रकारचे दाखले संगणीकृत प्रणालीमुळे सुलभरीत्या उपलब्ध होत होते. परंतु संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र (संग्राम) या पाच वर्षांपूर्वी सुरु केलेल्या प्रकल्पाची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी संपल्यानंतर त्यास अद्यापी मुदतवाढ देण्यात आली नसल्याने या योजनेअंतर्गत काम करणाऱ्या सुमारे २३ ते २५ हजार संगणक परिचालकांची माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सेवा समाप्त करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील संगणक परिचालकांना माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१५ या तीन महिन्यांचे थकित मानधनच मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर हिवाळी अधिवेशनात राज्यातील २५ हजार संगणक परिचालकांनी दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मा. ग्रामविकास मंत्री यांनी संग्राम प्रकल्पांतर्गत काम करणाऱ्या २७ हजार संगणक परिचालकांना कंत्राटी पद्धतीने सामावून घेऊन त्यांचे मानधन रुपये ४५००/- वरुन रुपये १५०००/- करण्याचे व संग्राम प्रकल्प २ मध्ये संगणक परिचालक हे पद ग्रामपंचायतला निर्माण करण्याचे आश्वासन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, आश्वासन देऊन अंमलबजावणी केली नसल्याने सदर संगणक परिचालक आजही हलाखीचे जीवन जगत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यातील पीआरआय प्रकल्पांतर्गत कार्यरत आलेले जिल्हा समन्वयक, सॉफ्टवेअर इंजि., जि.प.प.स. संगणक परिचालक यांना शासन सेवेत सामावून घेणेबाबत महाराष्ट्र राज्य (संगणक तज्ञ) जि.पं./प.स संग्राम कर्मचारी संघटना, जि.अहमदनगर यांनी मा.मुख्यमंत्री यांना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, सदर संगणक परिचालकांना पुन्हा सेवेत सामावून घेऊन त्यांचे थकित मानधन देण्यासाठी व संग्राम या योजनेस मुदतवाढ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून ई-पंचायत/ संग्राम प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत होती. १३ व्या वित्त आयोगाची मुदत संपुष्टात आल्याने या प्रकल्पाची अंमलबजावणी यंत्रणा असलेल्या महाऑनलाईन कंपनीने या प्रकल्पासाठी नियुक्त केलेल्या संगणक परिचालक (VLE) यांचा सेवा करार दि. ३१ डिसेंबर, २०१५ पासून समाप्त केला आहे.

(२) व (३) होय.

(४) व (५) नाही.

(६) अंशत: खरे, काही जिल्ह्यातील (संगणक तज्ञ) जिल्हा परिषद/ पंचायत समिती संग्राम कर्मचारी संघटना (नियोजित) यांनी निवेदने दिली आहेत. तथापि अहमदनगर जिल्ह्यातून निवेदन प्राप्त नाही.

(७) व (८) महाऑनलाईन कंपनीने नियुक्त केलेले तांत्रिक मनुष्यबळ हे स्वतंत्र उदयोजक (VLE) म्हणुन कार्यरत होते. ते राज्यशासन, जिल्हा परिषद/पंचायत समिती किंवा ग्रामपंचायतीचे कायम अथवा कंत्राटी कर्मचारी नाहीत. सबब, संगणक परिचालकांना पुन्हा सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

या प्रकल्पांतर्गत तांत्रिक मनुष्यबळ महाऑनलाईन कंपनीने उपलब्ध करुन दिलेले होते. त्यांना मोबदला अदा करण्याची वैधानिक जबाबदारी महाऑनलाईन कंपनीची असल्याने शासनाने सर्व तांत्रिक मनुष्यबळाचा मोबदला अदा करणेबाबत महाऑनलाईन कंपनीला निर्देशित केले आहे.

संग्राम-२ प्रकल्पाचे सुधारित धोरण व त्यानुसार पुढील अंमलबजावणी लवकरच अपेक्षित आहे.

----------------

**रत्नागिरी जिल्हयात मोठया प्रमाणात होणारी वृक्षतोड**

**(१५) * १४६९० श्री.विजय उर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात मोठया प्रमाणात वृक्षांची तोड होत असून २०१५ या वर्षात सुमारे ९,७०३ वृक्षांची विना परवाना तोड करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वृक्षतोड करणाऱ्या २८१ व्यक्तींवर वन विभागाने कारवाई करुन त्यांच्याकडून ४ लाख १४ हजार ६५० रुपये दंड गोळा करण्यात आल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैध जंगलतोड रोखण्यासाठी संबधित विभागाकडून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) रत्नागिरी जिल्हयात ९ तालुक्यांचा समावेश असून सन २०१५ या वर्षात खाजगी मालकी क्षेत्रात महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम-१९६४ सुधारणा १९८९ अंतर्गत १२१९५ अनुसूचित झाडांचे तोडीसाठी वृक्ष अधिकारी यांची परवानगी न घेता वृक्षतोड केलेचे निदर्शास आले आहे.

(२) या प्रकरणी चौकशी करणेत येऊन खाजगी मालकी क्षेत्रातील विनापरवाना तोडीबाबत दोषी आढळलेल्या ६९९ व्यक्तीकडून महाराष्ट्र वृक्षतोड (विनियमन) अधिनियमांतर्गत तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करणेत आली आहे. सदर व्यक्तीकडून एकूण दंड रु.६,१९,२५०/- वसूल करणेत आला आहे.

(३) मालकी क्षेत्रातील अवैध वृक्षतोडीबाबत नियंत्रणासाठी वनक्षेत्रपाल, वनपाल, वनरक्षक हे त्यांचे कार्यक्षेत्रात फिरती करुन गस्त घालत असतात. तसेच कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार तपासणीमध्ये आढळलेल्या विनापरवाना वृक्षतोडीच्या २५१ प्रकरणात महाराष्ट्र वृक्षतोड (विनियमन) अधिनियम-१९६४ अंतर्गत दंडात्मक कार्यवाही करणेत आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुमरगुंडा (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) येथे आदिवासी मुलाचा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्याबाबत

**(१६) * १६१५७ श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राजेंद्र जैन, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमरगुंडा (ता. एटापल्ली, जि.गडचिरोली) येथे तोदे मुरा पोटावी या आदिवासी मुलाला डायरियाची लागण होऊन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे त्याचा मृत्यू झाला व रुग्णालयांत शववाहिनी नसल्याने ७ कि.मी. अंतर पायपीट करुन मुलाचा मृतदेह रुग्णालयातून खांद्यावर घरी घेऊन जाण्याची नामुष्की त्याच्या पित्यावर आल्याची घटना दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार मुलाचे मृत्यूस कारणीभूत असलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर नक्षलग्रस्त दुर्गम भागात आरोग्य सेवा प्रभावी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय एटापल्ली, जि.गडचिरोली येथे दिनांक १२.०१.२०१६ रोजी संदीप तोंदे पोटावी, वय १० वर्षे (मुलगा) रा.तुमरगुंडा, ता.एटापल्ली हा रुग्ण भरती झाला होता. सदर रुग्णावर आवश्यक औषधोपचार करण्यात आला असून दिनांक १३.०१.२०१६ रोजी दुपारी १ वाजता पुन्हा सदर रुग्णाची प्रकृती बिघडल्याने सदर रुग्णावर पुन्हा उपचार सुरु करण्यात आले. संध्याकाळी रुग्णाची प्रकृती गंभीर झाल्याने संदर्भित करणे आवश्यक होते. तथापि, रुग्णाच्या नातेवाईकांनी त्यास नकार दिला व स्वत:च्या जबाबदारीवर संमतीपत्र लिहून देऊन रुग्णास घरी नेले. दिनांक १३.०१.२०१६ रोजी मुलाचा आजार गंभीर झाल्याने मृत्यू झाला.

(२) होय.

प्रस्तुत घटनेच्या चौकशी प्रकरणी दिनांक १५.०१.२०१६ रोजी शरीर विकृती शास्त्रज्ञ, वर्ग १ सामान्य रुग्णालय, गडचिरोली यांनी चौकशी केली तसेच दिनांक १६.०१.२०१६ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, गडचिरोली व दिनांक १७.०१.२०१६ रोजी उपसंचालक आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांनी चौकशी केली.

(३) प्रस्तुत घटनेबाबत चौकशी अहवालात नमुद वस्तुस्थितीवरुन वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याबाबत, अनधिकृत गैरहजर असणे. लोकप्रतिनिधींशी वागणूक चांगली नसणे, तसेच उपचारासाठी दाखल झालेल्या रुग्णांना व्यवस्थितपणे समुपदेशन न करणे इत्यादी बाबी निदर्शनास आल्याने सदर घटनेच जबाबदार वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी यांना निलंबित करण्यात आले आहे.

(४) गडचिरोली या जिल्ह्याला महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पांतर्गत एकूण ९ रुग्ण वाहिका देण्यात आलेल्या आहेत. सामान्य रुग्णालय, गडचिरोली, उपजिल्हा रुग्णालय, अहेरी ग्रामीण रुग्णालय, कोरची, एटापल्ली, सिरोंचा, मुलचेरा, भामरागड इत्यादी ठिकाणी रुग्णवाहिका आहेत. या योजनेंतर्गत २ प्रकारच्या रुग्ण वाहिका ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट (एएलएस) आणि बेसिक लाईफ सपोर्ट (बीएलएस) पुरविण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत गडचिरोली जिल्ह्यात रुग्णवाहिकेमार्फत एकूण ६,०७३ इतक्या रुग्णांना मोफत संदर्भसेवा देण्यात आली आहे. ग्रामीण रुग्णालय, एटापल्ली येथील वैद्यकीय अधिकारी यांची दोन्ही पदे भरण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उर्ध्व गोदावरी प्रकल्पामधील मांजरपाडा (जि. नाशिक) वळण योजनेचे काम सुरु करण्याबाबत

**(१७) * १४९३० श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक ८०२८ ला दिनांक २८ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्ध्व गोदावरी प्रकल्पामधील मांजरपाडा (जि.नाशिक) वळण योजनेचे काम तातडीने सुरु करून पाणी उपलब्ध करून दिले जाईल असे आश्वासन मा. मुख्यमंत्री यांनी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मांजरपाडा (जि नाशिक) वळण योजनेसाठी सन २०१४ - १५ मध्ये मंजूर असलेला रुपये ७० कोटी निधी या योजनेकरिता आवश्यक असल्यामुळे सदर निधी अन्य योजनांसाठी वळती करू नये याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनास निवेदन दिलेले असूनही सदर प्रकल्पाचा रुपये ४३ कोटी निधी कार्यकारी संचालकांनी अन्यत्र वळती केला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून या प्रकल्पाचा निधी पुनःश्च मांजरपाडासाठी पुनर्वितरण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) सदर योजनेतील बोगद्याचे काम जरी पूर्ण झाले तरी गुजरातकडे जाणारे पाणी महाराष्ट्राकडे वळेल त्यामुळे या योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत किंवा या योजनेसाठी मंजूर निधी खर्च करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनेकदा शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) सन २०१५ च्या पहिल्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये मांजरपाडा २ च्या योजनेसंदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सन २०१४-१५ करीता मंजूर अनूदान रु. ७०.०० कोटी होते, त्यापैकी रु. २६.८० कोटी निधी प्राप्त झाला.

प्राप्त निधी अन्यत्र वळती केला नाही तथापि, सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च करण्यास शासन मान्यता नसल्याने योजनेवर खर्च करण्यात आलेला नाही. रु. २६.३८ कोटी इतका निधी शिल्लक आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) होय.

(५) दिनांक ३०.०१.२०१५ च्या शासन पत्रान्वये मांजरपाडा वळण योजनेच्या वाढलेल्या किंमतीबाबत राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडून सविस्तर चौकशी अहवाल मागविण्यात आला होता.

सिंचन विषयक विशेष चौकशी समितीचा अहवालावरील शासनाच्या कार्यपालन अहवालानुसार उर्ध्व गोदावरी प्रकल्पाअंतर्गत मांजरपाडा वळण योजनेमध्ये संकल्पचित्रातील बदलामुळे वाढलेल्या किंमतीबाबत राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडून तपासणी करुन घेण्यात आली असून या समितीच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात “अहिल्याबाई होळकर महिला बाजारपेठ” योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(१८) * १५२३० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५ मध्ये मा. मंत्री, वित्त यांनी राज्यातील प्रत्येक जिल्हयात “अहिल्याबाई होळकर महिला बाजारपेठ” स्थापन करण्याची घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या माध्यमातून बचत गटांच्या हजारो महिला सदस्यांना शाश्वत स्वरुपाचा रोजगार उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेकरिता सुमारे २०० कोटी रुपयांचा निधी अर्थसंकल्पात चिन्हांकित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर चिन्हांकित निधी दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर व्यपगत होणार असल्याबाबत आयुक्त, महिला व बालकल्याण यांना वारंवार पत्रव्यवहार करुन देखील कार्यवाही होऊ शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरची बाजारपेठ स्थापन न होण्यामागची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) होय.

(४) मा. मंत्री वित्त महोदयांच्या सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामधील चिन्हांकित रक्कमा दर्शविलेल्या योजनासंदर्भात कार्यवाही करण्याबाबत अ.मु.स. (नियोजन) यांचेकडे दि. ३०.७.२०१५ रोजी बैठक झाली. सदर बैठकीमध्ये महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तुंसाठी बाजारपेठ/विक्री केंद्रे निर्माण करण्याची कार्यवाही ग्राम विकास विभागाकडून केली जाते. त्यामुळे महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंच्या विक्रीसाठी जिल्हास्तरावर कायमस्वरुपी "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ" निर्माण करणे ही नवीन योजना ग्राम विकास विभागामार्फत राबविण्याबाबत अ.मु.स. (नियोजन) यांनी निर्देश दिले. तसेच बाजारपेठ/विक्री केंद्रे निर्माण करण्याची बाब ग्रामविकास विभागाशी संबंधित असल्याने व बाजारपेठ निर्माण करण्याबाबतची यंत्रणा महिला बाल विकास विभागाकडे उपलब्ध नसल्याने सदर योजना अ.मु.स. (नियोजन) यांनी दिलेल्या निर्देशानुसार ग्रामविकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली. तथापि, सद्यस्थितीत ग्रामविकास विभागाकडे सुरु असलेली तालुकास्तरीय विक्री केंद्राची योजना बंद करण्याबाबत त्या विभागाकडे प्रस्ताव विचारधीन असून सदरची नवीन योजना राबविणेसाठी ग्रामविकास विभागामार्फत राबविणे शक्य नसल्याचे ग्रामविकास विभागाने दि. १६.२.२०१६ व दि. २४.२.२०१६ रोजी महिला व बाल विकास विभागास कळविले आहे. तसेच सदर योजना पूर्णत: नवीन असल्याने त्यासाठी प्रशासकीय मान्यता देणे, नवीन लेखाशिर्ष उपलब्ध करुन घेणे या बाबी दि. ३१ मार्च, २०१६ पूर्वी पूर्ण करणे शक्य नसल्याने यासाठी चिन्हांकीत केलेला नियतव्यय वापरणे या वर्षात शक्य नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिंगोली जिल्हयात मृद संधारणाच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(१९) * १५०३८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ११७८८ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील कृषि विभागांमार्फत करण्यात आलेल्या मृद संधारण, जलसंधारण, पाणलोट व इतर कामांत कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या सर्व यंत्रणांची राज्यस्तरावरील विशेष भरारी पथकांमार्फत चौकशी करण्यात यावी अशा मागणीवरून वरीष्ठ स्तरावरून चौकशी करण्याचे आदेश कृषि आयुक्त, पुणे यांनी सन २०१५ मध्ये दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीसाठी नियुक्त केलेल्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागी जाऊन चौकशी करून अहवाल वरिष्ठांकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषी संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) अधिक्षक कृषि अधिकारी (दक्षता पथक), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत तपासणीचे काम सुरु असून प्रगतीपथावर आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अन्न व नागरी पुरवठा विभागाने राज्यातील बालगृहांना दिले जाणारे धान्य बंद केल्याबाबत**

**(२०) * १५९४६ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनाथ, निराधार बालकांचे संगोपन करणाऱ्या स्वयंसेवी बालगृहांची संख्या किती आहे,

(२) सदर संस्थांचे गेल्या ३ वर्षापासून राज्य शासनाने अनुदान बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच पुरवठा विभागाकडून बालगृहांना दरमहा नारी निकेतन योजनेअंतर्गत बीपीएल दराने मिळणारा गहू व तांदूळ या संस्थांना दिला जात होता व तो पुरवठा शासनाने गेल्या चार महिन्यांपासून बंद केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संस्थांचा धान्य पुरवठा बंद करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, शासकीय गोदामात स्वस्त धान्य पुरवठा सडून जात आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, संबंधित बालगृहांना बीपीएल दराने गहू व तांदूळ पुरवठा पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) राज्यामध्ये एकूण ९९४ अनुदानित स्वयंसेवी बालगृहे आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) सदर धान्याचा अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे गोदामातून पुरवठा केला जात असल्याने सदर बाब या विभागाशी संबंधित नाही.

(६) संबंधित बालगृहांना बीपीएल दराने करण्यात येणारा गहू व तांदूळ पुरवठा बंद केलेला नसल्याने तो पूर्ववत सुरू करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### देवगड तालुक्यातील (जि.सिंधुदूर्ग) ग्रामीण रुग्णालयामध्ये स्नायूदुखीवरील इंजेक्शनची रिॲक्शन होऊन एक रुग्ण दगावल्याबाबत

**(२१) * १५६६६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड तालुक्यातील (जि. सिंधुदूर्ग) ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल केलेल्या तीन रुग्णांना स्नायूदुखीवरील इंजेक्शनची रिॲक्शन होऊन कावलेवाडी येथील एक रुग्ण दगावला व दोन रुग्ण अत्यवस्थ असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेनंतर संबंधित विभागातील संतप्त नागरिकांनी दीड तास रास्ता रोको करुन घोषणेबाजी करुन याप्रकरणी प्रथम दर्शनी दोषी आढळलेले डॉ.अमरीश आगाशे यांच्या निलंबनाची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) या प्रकरणी संचालकांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने चौकशी केली असून समितीच्या अहवालाच्या आधारे डॉ.अंबरीश आगाशे यांना निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाने पाण्याच्या वाटपाचे विस्तृत धोरण आखण्याबाबत

**(२२) * १५३७९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पाण्याची उपलब्धता, ऊसाला लागणारे जादा पाणी आदी सर्व बाबींचा विचार करुन शासनाने व राज्य जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाने पाण्याच्या वाटपाचे विस्तृत धोरण आखावे अशी सूचना मा. उच्च न्यायालयाने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान एका जनहित याचिकेवरील सुनावणीच्यावेळी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने यासंदर्भात केलेल्या सूचनांचे सविस्तर स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही

पाणी वाटपाचे विस्तृत धोरण आखण्याची सूचना मा. उच्च न्यायालयाने माहे डिसेंबर-२०१५ वा त्या दरम्यान केलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पेंडगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील इक्बाल वस्तीतील अंगणवाडी शाळेत मुदतबाहय शेंगदाणा चिक्कीचे वाटप केल्याबाबत**

**(२३) * १५५०४ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंडगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील इक्बाल वस्तीतील अंगणवाडी शाळेत सुर्यकांतांच्या मुदतबाहय शेंगदाणा चिक्कीचे वाटप करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुदतबाहय शेंगदाणा चिक्कीचे वाटप थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जव्हार तालुक्यात (जि.पालघर) येथील कुपोषण दूर करण्याबाबत**

**(२४) * १५६८१ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक १३६५७ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील आदिवासी भागात ५ हजारापेक्षा जास्त कुपोषित बालके असून त्यापैकी जव्हार तालुक्यात १२०० आदिवासी बालके तीव्र कुपोषित असून ती मृत्यूच्या सापळयात असल्याची बाब आदिवासी सामाजिक संघटनेने माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान परिसराची पाहणी करुन जव्हार येथील संबंधित शासकीय कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासनाकडून आजवर हाती घेण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अनुपालन अहवालाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

पालघर जिल्ह्यामध्ये माहे नोव्हेंबर, २०१५ अखेर तीव्र कमी वजनाची एकूण ७०९१ बालके आहेत. त्यापैकी ५५४९ बालके नवसंजिवनी क्षेत्रातील आहेत.

पालघर जिल्हयातील जव्हार तालुक्यात दोन एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प असून माहे नोव्हेंबर २०१५ च्या आकडेवारीनुसार जव्हार-१ मध्ये ७३८ व जव्हार-२ मध्ये ७८० अशी एकुण १५१८ एवढी तीव्र कमी वजनाची बालके आहेत.

(२) व (३) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

१) अंगणवाडी कार्यक्षेत्रातील सर्व बालकांना तसेच गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना पुरक पोषण आहार दिला जातो. ६ महिने व ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना ५०० उष्मांक व १२ ते १५ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार, तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील तीव्र कमी वजनाच्या बालकांना ८०० उष्मांक व २० ते २५ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार देण्यात येतो.

२) बालकांना ग्राम बाल विकास केंद्रात दाखल करुन त्यांना आहार व आरोग्याची सेवा देवून यांच्या वजनात व श्रेणीवर्धनात सुधारणा होत आहे. तसेच खाजगी संस्थांच्या सहकार्याने देखील ग्राम बाल विकास केंद्रात तीव्र कुपोषित बालकांना आरोग्य व आहाराची सेवा देण्यात येते.

३) सॅम व मॅम मधील बालकांची दरमहा वैद्यकीय तपासणी केली जाते. तसेच ० ते ६ वयोगटातील बालकांना वर्षातून दोन वेळा अ जिवनसत्व व जंतनाशक औषधी दिली जातात.

४) CSR अंतर्गत JSW फाउंडेशन यांचे सहकार्याने जव्हार येथे कुपोषण कमी करण्यासाठी पुढाकार घेऊन विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. ज्यामध्ये महिला सक्षमीकरण, सामाजिक सहभागाकरिता ग्रामसभा, अंगणवाडी कार्यकर्ती/ मदतनीस यांना प्रशिक्षण,मुख्यसेविका यांचेमार्फत पथनाटय असे विविध उपक्रम राबविले जात आहेत. सदर

उपक्रमामुळे ग्रामीण, आदिवासी भागात गरोदर मातेस चौरस पोटभर आहार देणे, कामाचे तास कमी करुन जास्तीत जास्त विश्रांती घेणे, बालकास स्तनपानाचे महत्व इ. बाबींची जनजागृती वाढत आहे. त्यामुळे सर्वसाधारण बालकांच्या संख्येमध्ये सुधारणा झाल्याचे दिसून येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाच्या विविध खात्यांकडे उपलब्ध निधी वापराविना पडून असल्याबाबत**

**(२५) * १५३६४ अॅड.अनिल परब, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठी विविध खात्यांसाठी ८९ हजार २१५ कोटी मंजूर करण्यात आले असतानाही दिनांक १ एप्रिल २०१५ ते आतापर्यंत (दिनांक ११ जानेवारी, २०१६ अखेरपर्यंत) सर्व शासकीय विभागांनी एकत्ररित्या केवळ १७.२६ टक्के म्हणजेच १५ हजार ४९८ कोटीचा निधी वापरला असून आतापर्यंत झालेला खर्च हा अलिकडच्या काही वर्षातील सर्वात कमी खर्च आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात राज्य शासनाच्या विविध खात्यांकडे उपलब्ध निधीपैकी केवळ १० टक्के निधीचा वापर झाल्याचे तर तब्बल ७३,७१७ कोटीचा निधी वापराविना पडून असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर निधीचा वापर न करण्यामागची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३), (४) व (५) रु. ८९.२१५ कोटी पैकी रु. १४.९९१ कोटी एवढी रक्कम वर्षाच्या सुरुवातीला अर्थसंकल्पीत न झालेल्या नियतव्ययाची आहे. त्यामुळे राज्य शासनाला सन २०१५-१६ मध्ये रु. ७४.२२४ कोटी एवढा योजनांतर्गत खर्च करावा लागणार आहे.

त्यापैकी जानेवारी अखेर विविध विभागांना रु. ४९.४८७ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन दिलेला असून त्यापैकी रु. २६.५५२ कोटी एवढा खर्च झालेला आहे. हा खर्च उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीच्या ५४% आहे.

वित्तीय व्यवस्थापनासाठी प्रत्येक विभागाला मासिक निधी विवरणपत्र तयार करुन त्यानुसार खर्च करावा लागतो. तसेच बऱ्याच योजनांचा आर्थिक वर्षातील खर्च हा पावसाळा संपल्यानंतर सुरु होतो. त्यामुळे काही प्रमाणात खर्च कमी दिसत आहे.

-----------------

**कृषी कार्यालयाच्यावतीने (ता.लोहा, जि.नांदेड) राबविण्यात येणाऱ्या जलयुक्त शिवार अभियान, पाणलोट, जलसंधारण कामात झालेला गैरव्यवहार**

**(२६) * १५०६७ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा तालुक्यातील (जि.नांदेड) तालूका कृषी कार्यालयाच्यावतीने राबविण्यात आलेल्या जलयुक्त शिवार अभियान, पाणलोट, जलसंधारण कामात गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) १ जानेवारी, २०१६ रोजी दैनिक पुण्यनगरी मध्ये "कृषी विभागाच्या कामाची होणार चौकशी" या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध झाली हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी कृषि आयुक्तालयातील दक्षता पथकामार्फत सविस्तर चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाच्या १२ रुग्णालयांना बाजारभावापेक्षा जवळपास दुप्पट दराने भाज्या, कडधान्ये व फळांचा पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांविरुद्ध कारवाई करण्याबाबत**

**(२७) * १४८०१ श्री.माणिकराव ठाकरे, ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ३८२० ला दिनांक ६ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दीक्षा सामाजिक संस्थेला सन २०१० ते २०१५ या कालावधीत राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आपत्कालीन रुग्णालयामध्ये कोट्यवधी रुपयांचे अन्नधान्य पुरवठ्यांचे कंत्राट देताना मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २००९ पासून शासनाच्या १२ रुग्णालयांना बाजारभावापेक्षा दुप्पट दराने भाज्या, कडधान्ये व फळांचा पुरवठा करणाऱ्या २ कंत्राटदारांविरुद्ध केलेला चौकशी अहवाल माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागात कोट्यवधी रुपयांच्या अन्नधान्य खरेदीमध्ये काही विशिष्ट व्यक्ती आणि संस्थाना फायदा पोहचावा या पद्धतीने आदेश काढण्यात आल्याचा आरोप चौकशी अहवालात ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालामध्ये कोणत्या प्रमुख बाबी अंतर्भूत आहेत,

(५) असल्यास, राज्य कामगार विमा योजनेचे आयुक्त जे.पी.गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्य समितीने या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३), (४), (५) व (६) होय, हे खरे आहे.

श्री.जे.पे.गुप्ता, राज्य कामगार विमा योजना यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्य समितीने चौकशी अहवालामध्ये नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव (गृह) यांचे मार्फत सखोल चौकशी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुई धमकडी (ता.उरण, जि.रायगड) येथील खारभूमी योजनेच्या कामासाठीच्या मंजुरीबाबत

**(२८) * १४९०४ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १३७२५ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यास सन २०१५-१६ साठी ३ कोटी रुपयांचा निधी खार बंदिस्ती कामासाठी उपलब्ध केला आहे. या निधीतून जुई धमकडी (ता.उरण, जि.रायगड) या खारभूमी योजनेच्या कामासाठी क्षेत्रीय स्तरावर केव्हा मंजुरी देण्यात आली,
(२) असल्यास, मंजुरी देण्यात आलेली एकूण रक्कम किती आहे,
(३) तसेच जुई धमकडी या खारभूमी योजनेच्या कामावर रु.१२ लाख २ हजार केव्हा खर्च करण्यात आले,
(४) असल्यास, रायगड जिल्ह्यासाठी एकूण ३ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून, या निधीतून अन्य कोणत्या खारबंदिस्ती कामावर खर्च करण्यात आला आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) सन २०१५-१६ या वर्षामध्ये जुई धमकडी खारभूमी योजनेच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामास मंजूरी देण्यात आली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) जूई धमकडी या खारभूमी योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी मागील पाच वर्षात मार्च, २०१५ अखेर पर्यंत रु. १२.०२ लक्ष इतका खर्च झाला आहे.
(४) रायगड जिल्ह्यासाठी देखभाल व दुरुस्ती अंतर्गत सन २०१५-१६ या वर्षासाठी उपलब्ध निधीपैकी रु. २.५२ कोटी इतका निधी सन २०१०-११ पासून प्रलंबित दायित्व अदा करणेसाठी खर्च केला आहे. सदर खर्च उरण, पनवेल, पेण, अलिबाग, मुरुड, माणगांव, श्रीवर्धन व म्हसळा या तालुक्यांतर्गत असलेल्या खारभूमी योजनांच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी खर्च करण्यात आलेला आहे.

-----------------

## कोदवली व अर्जुना (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) या नदयांमधील गाळ काढण्याबाबत

**(२९) * १५९६० श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) येथील शहरात दरवर्षी पुराच्या पाण्याचा त्रास होऊन शहराचे जनजीवन तसेच वाहतूक विस्कळीत होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील कोदवली व अर्जुना या दोन नद्यांतील गाळ काढण्याची मागणी लोकप्रतिनिधी व जनतेने गेली अनेकवर्ष जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील यांत्रिकी विभागामार्फत कोदवली व अर्जुना या दोन नद्यांतील गाळ काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. आज अखेर पर्यंत कोंदवली व अर्जुना नदीतील १४०.३० सहस्त्र घन मीटर इतका गाळ काढण्यात आलेला आहे. गाळ्याच्या उर्वरीत परिमाणाकरीता आवश्यक निधी पुरवठा करुन गाळ काढण्याचे काम करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ११६ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द करण्याचा निर्णयाबाबत

**(३०) * १६०७६ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागाने महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवेसाठी नियुक्ती देण्यात आलेल्या परंतु नेमणुकीच्या ठिकाणी रुजु न झाल्याने ११६ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द केल्याने ग्रामीण भागातील रुग्णसेवेवर त्याचा परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील रुग्णसेवेवर परिणाम होवु नये म्हणून शासनाने कोणती पर्यायी व्यवस्था केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय,

माहे एप्रिल, २०१४ व माहे, एप्रिल-मे, २०१५ मध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गात नियुक्ती दिलेल्या तथापि नुियक्तीच्या ठिकाणी रुजू न झालेल्या ११६ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती शासन निर्णय दि. ०२.०१.२०१६ अन्वये रद्द करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना आवश्यक रुग्णसेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) ग्रामीण भागातील रुग्णसेवेवर परिणाम होऊ नये म्हणून १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे जिल्हास्तरावरुन सरळ मुलाखतीद्वारे भरण्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. तसेच इतर जिल्हयातील पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खान्देशातील मेगा रिचार्ज प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(३१) * १५१४० श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खान्देशातील मेगा रिचार्ज प्रकल्पाला केंद्र शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कालबद्ध योजना निर्माण केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्प कशा पद्धतीने व किती कालावधीत पूर्ण होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने दि. ३१/१२/२०१४ रोजी मेगा रिचार्ज प्रकल्पाच्या संभाव्यता व व्यवहार्यता तपासणेकरीता संचालक, राष्ट्रीय जल विज्ञान संस्थान, रुरकी यांचे अध्यक्षतेखाली कृति गटाची नेमणूक केली. या गटाने तापी खोऱ्यामधील भूशास्त्रीय स्ट्रक्चर विचारात घेता मेगा रिचार्ज योजना ही व्यवहार्य असल्याची शिफारस केली आहे.

मा. केंद्रीय जलसंसाधन मंत्री, नवी दिल्ली यांनी दि. ०९/०१/२०१६ रोजी प्रकल्पाची क्षेत्रिय पाहणी केली. तद्नंतर झालेल्या बैठकीत केंद्र शासनाने केंद्रीय जलसंसाधन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे निर्देश शासनास दिलेले आहेत.

(२) सद्यस्थितीत योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी कृतीदलाने सुचविल्यानुसार खालील अभ्यास करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

अ) Hydrological study

ब) Remote Sensing & GIS study

क) Airborne Geophysical Survey

महाकाय पुनर्भरण योजनेच्या सर्वेक्षणासाठी व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी तापी खोरे सर्वेक्षण व अन्वेषण विभाग जळगाव हा विभाग जळगाव येथे दि. १/२/२०१६ पासून स्थापन केलेला आहे.

(३) योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक सर्वेक्षण व अभ्यास प्रगतीत असून जून २०१७ पर्यंत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे नियोजन आहे. सध्या सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या अवस्थेत असल्यामुळे प्रकल्प पूर्ण करण्याचा निश्चित कालावधी सध्या सांगता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**नगर जिल्ह्यातील सरहद्दीवरील म्हसवडी या घाटातील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३२) * १५६४३ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर जिल्ह्यातील सरहद्दीवरील म्हसवडी या घाटातील रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असल्यामुळे वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होऊन अनेकदा अपघात होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्नांकित रस्ता रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार इतर जिल्हा मार्ग क्र.५ दर्जाचा असून त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी.आहे. सदर रस्त्याच्या ०/०० ते ०/६५० कि.मी. लांबीतील डांबरीकरणाचे काम सन २०१२-२०१३ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. १/८०० ते २/३०० कि.मी. लांबीतील खडीकरण व २/४०० कि.मी. मध्ये रस्त्याचे कटींग करण्याचे काम सन २०१३-२०१४ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. ०/६५० ते १/०८५ कि.मी. मधील डांबरीकरणाचे काम सन २०१४-२०१५ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात आरोग्य यंत्रणेचा दर्जा खालावल्याबाबत**

**(३३) * १५५३३ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात आरोग्य यंत्रणेचा दर्जा अतिशय खालावला आहे तसेच डॉक्टरांची रिक्त पदे, औषधांचा तुटवडा यामुळे रुग्णांना आरोग्यसेवा वेळेवर मिळत नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी मा.आरोग्य राज्यमंत्री यांच्या बंगल्यासमोर निदर्शने केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयाचा दर्जा उंचविण्याबाबत तसेच रुग्णांना आरोग्य सेवा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) देवगड (जि.सिंधुदुर्ग) येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वीत आहे. सदर रुग्णालयाचे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय म्हणून श्रेणीवर्धन करण्यास शासन मान्यता देण्यात आली असून रुग्णालयाच्या बांधकामाच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात मिळालेल्या निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(३४) * १५८३७ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.राजेंद्र जैन :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा नियोजनाचा आराखडा दोनशे कोटी रुपयावर मिळण्याची घोषणा रायगड जिल्हयाच्या पालकमंत्र्यांनी केली असताना प्रत्यक्षात रुपये १४९ कोटी उपलब्ध झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आर्थिक वर्ष संपण्यास दोन ते तीन महिने शिल्लक असताना ७५ टक्के निधी विनियोगाविना पडून आहेत, हेही खरे आहे काय,
(३) तसेच रायगड प्रमाणेच रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथे ही बरीच रक्कम अखर्चित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एवढया मोठया प्रमाणात निधी अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत, हा निधी त्वरीत विकास कामावर खर्च करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१५-१६ करीता रायगड जिल्ह्यासाठी रु.१४१.५१ कोटी रक्कमेची कमाल नियतव्यय मर्यादा ठरवून देण्यात आली होती त्यानुषंगाने राज्यस्तर बैठकीत वाढीव रक्कमेसह रु.१५४.७० कोटीचा आराखडा सादर करण्यात आला होता. त्यानुसार रु.१४९.४९ कोटी रक्कमेच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) रायगड अंतर्गत सन २०१५-१६ मधील विकास कामासाठी वितरीत करण्यात आलेल्या निधी पैकी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये ४२ टक्के निधी खर्च झालेला आहे. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यास वितरित निधी पैकी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये अनुक्रमे ४६ टक्के व ४० टक्के निधी खर्च झालेला आहे.

(४) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१५-१६ च्या खर्चात वाढ होऊन मार्च, २०१६ अखेर पर्यंत १०० टक्के निधी खर्च होईल या बाबत तातडीने कार्यवाही करण्याच्या सुचना संबंधित जिल्हाधिकारी यांना शासन पत्र दिनांक २० जानेवारी, २०१६ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**पंढरपूर (जि.सोलापूर) शहर व तालुक्यात आरोग्य सुविधा उपलब्ध करण्याबाबत**

**(३५) * १५५१५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) शहर व तालुक्यात रुग्णांसाठी कोटयवधी रुपयांचा खर्च करुन उभारण्यात आलेल्या शासकीय यंत्रणेकडून समाधानकारक आरोग्य सुविधा मिळत नसल्याच्या तक्रारी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

पंढरपूर (जि.सोलापूर) येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय आहे. सदर रुग्णालयात विविध विशेषज्ञ विभाग कार्यरत आहेत. या रुग्णालयात रुग्णांना तात्काळ सुविधा मिळावी याकरीता २४ तास तात्काळ सेवा देणारा विभाग कार्यरत असुन वेळोवेळी रुग्ण त्याची सुविधा घेत आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वर्धा जिल्हयात एकाच गावामध्ये दोन ग्रामभवनाला परवानगी दिल्याबाबत**

**(३६) * १५१८५ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील ग्रामपंचायतीमध्ये एक ग्रामभवन असताना दुसरे ग्रामभवन बांधण्याकरीता मंजूरी देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिंचोली रामगाव या ग्रामपंचायतीमध्ये जुने ग्रामभवन सुस्थितीत असताना दुसऱ्या ग्रामभवनाची परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांनी येथे ग्रामभवन आहे असा अहवाल जिल्हा परिषदेला सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामभवन तयार करण्याबाबत आदर्श आराखडा तयार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

(२) वर्धा जिल्हा परिषदे अंतर्गत सदर ग्रामपंचायत चिचोली रामगाव नसून चिंचोली (डांगे) आहे. जुन्या ग्रामभवनामध्ये एकच खोली असून जागा अपूरी पडत असल्याने नवीन ग्रामपंचायत इमारत बांधण्यात यावी, असा अहवाल सादर केला आहे.

(३) होय.

ग्रामपंचायतींचा आदर्श आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दहिसर मोरी (जि.ठाणे) येथील दलितांना पिण्याच्या पाण्याची सोय करुन देण्याबाबत

**(३७) * १५४२० श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर नागांव रोडवरील दहिसर मोरी (जि.ठाणे) या गावात असलेली दलित समाजासाठी राखीव विहीर काही व्यक्तींनी हेतूपुर्वक बुजवुन त्यावर गोदाम बांधले आहे, त्यामुळे येथील दलितांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन विहीर बुजविण्यावर कारवाई करण्यासोबतच येथील दलितांना पिण्याच्या पाण्याची सोय करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) दहिसर गावातील दलित वस्ती येथे असलेली विहिर सन २००५ मध्ये बुजविण्यात आली ही बाब खरी आहे. मात्र त्यामुळे दलित वस्तीतील दलितांना पाण्यासाठी वणवण करावे लागत असल्याची बाब खरी नाही.

(२) दहिसर ग्रामपंचायती अंतर्गत ४ पाडे असून त्यापैकी खुद्द दहिसर गावामध्ये दलिवस्ती आहे. सदर दलितवस्तीकरीता मौजे दहिसर येथील जूना पर्डी नं. ५ पैकी स नं ८८/१ येथे ८० वर्षापासूनची म्हणजेच साधारण सन १९३५ साली बांधण्यात आलेली विहिर २००५ मध्ये बुजविण्यात आली अशी तक्रार आहे. सदर जागेबाबत उपलब्ध माहितीनुसार श्री.रामदास गेणु गायकवाड यांनी सन १९८८ साली गंगाबिशन वसीन यांना व श्री.गंगाबिशन वसीन यांनी सन १९९७ साली श्री.मोहम्मद याकूब खान यांना विकली आहे. सदर जागेच्या ७/१२ उताऱ्यामध्ये विहिरीची नोंद दिसून येत नाही. तसेच सद्यस्थितीत सदर जागेमध्ये विहिरीचे अस्तित्व निदर्शनास आलेले नाही. परंतु गाव नमुना १४ मध्ये पर्डी नं ५ हरीजनवाडी येथे पक्की लोकोपयोगी विहिर असल्याची नोंद दिसून येते. तसेच माहे ऑगस्ट, २००५ मध्ये जागा मालक श्री.महम्मद हसन खान व हरीजन वस्तीतील ग्रामस्थ यांच्यामध्ये विहिर बुजवून त्याऐवजी बोअरवेल देण्याबाबत करारनामा करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत दलित वस्तीसाठी विंधन विहिर उपलब्ध आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत काम सुरु असलेल्या दहिसर गोठेघर व १४ गावांच्या योजनेमधुन दहिसर गावास तात्पुरत्या स्वरुपात पाणी सुरु करण्यात आले आहे. सदर योजनेमधुन दलितवस्तीसाठी पाईपलाईन अंथरण्यात आली आहे. तसेच दहिसर येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत उंच टाकीचे काम प्रगतिपथावर असून सदर काम पुर्ण झाल्यानंतर दहिसर गावाचा तसेच दलित वस्तीचा पाणीप्रश्न संपुष्टात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे तोडोळी-दाभाडी (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांना विहीर खोदण्याचे अनुदान देण्याबाबत**

**(३८) * १५६६३ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तोडोळी-दाभाडी (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील सुमारे १० शेतकऱ्यांना विहीर खोदण्याबाबत सन २०१२ मध्ये मंजूरी देण्यात आली असून अद्याप शासनाकडून अनुदान देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त शेतकऱ्यांना विहीर खोदण्याचे अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) मौजे तेंडोळी-दाभडी (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथे सन २०१२ या आर्थिक वर्षामध्ये कोणत्याही लाभार्थ्यांचे महात्मा गांधी नरेगाअंतर्गत सिंचन विहिरींच्या कामाचे प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत. तथापि, १० लाभार्थ्यांचे सिंचन विहीरींचे प्रस्ताव दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ रोजी पंचायत समिती स्तरावर प्राप्त झाले. सदर विहिरीच्या प्रस्तावांना दिनांक २७ फेब्रुवारी, २०१६ रोजी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**येलदरी (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथील जलसंधारणाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३९) * १४६१७ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येलदरी (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथील जलसंधारणाच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुल्यांकनाविना लाखो रुपयांची देयके कंत्राटदाराला देण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येलदरी येथे पाणलोट प्रकल्पांतर्गत नाला सरळीकरण, ढासळलेले बंधारे दुरुस्ती करणे, सिमेंट बंधारे बांधणे आदि कामे मंजूर करण्यात आली, काम पूर्णही करण्यात आले परंतु कामाचा दर्जा न तपासताच देयके काढण्यात आली असल्यामुळे संबधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) मौजा येलदरी हे गाव गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत निवडण्यात आले असून आदिवासी उपायायेजनेतंर्गत सदर गावामध्ये सन २०१४-१५ या वर्षात ढाळीच्या बांधाच्या ४ गटांची अंदाजे ११० हेक्टर क्षेत्रावर कामे करण्यात आली आहेत. त्यावर रु.८.७१ लाख खर्च करण्यात आला आहे.

सदर कामे सुरु असताना संबंधित अधिकाऱ्यांनी विहीत टक्केवारीनुसार कामांची तपासणी केली असून सदर कामाबाबत ग्रामस्थ व इतर कुणाचीही तक्रार जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, यवतमाळ यांचेकडे प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**राज्यातील आरोग्य विभागातील डॉक्टर्सची पदे भरण्याबाबत**

**(४०) * १५४८२ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : तारांकित प्रश्न क्रमांक १२६९७ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरीकांना दर्जेदार आणि तत्पर सेवा पुरविण्यासाठी आरोग्य विभागातील ४०० डॉक्टर्सची पदे भरण्यात यावीत, असे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १३.१०.२०१५ रोजी वा त्यासुमारास मुंबईत मंत्रालयात आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाची प्रत्येक जिल्हयात प्रत्येक पदांची अनेक पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने आतापर्यंत राज्यात जिल्हानिहाय किती पदे भरली आहेत वा भरण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही, तथापि वैद्यकीय अधिकारी संवर्गातील पदे उमेदवार उपलब्ध होत नसल्यामुळे रिक्त राहतात, त्यामुळे सदर पदे सरळ मुलाखतीद्वारे (Walk in interview) भरण्याबाबतच्या आरोग्य विभागाच्या प्रस्तावास सामान्य प्रशासन विभागाने मान्यता देण्याचे निदेश मा. मुख्यमंत्री यांनी दि. १३.१०.२०१५ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये दिले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागांमध्ये आरोग्य सेवा संचालनायांतर्गत गट अ ते गट- ड संवर्गाची एकूण ५३५४९ पदे मंजूर असून त्यापैकी ३८४५२ पदे भरलेली व १५०९७ पदे रिक्त आहेत.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. वैद्यकीय अधिकारी गट अ संवर्गातील २३६ विशेषज्ञांना शासन निर्णय दि. ०१.१०.२०१५ अन्वये व एमबीबीएस अर्हताधारक ४६६ वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासन निर्णय दि. १८.११.२०१५ अन्वये नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच १४ आत्महत्याग्रस्त जिल्हयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे जिल्हास्तरावरुन सरळ मुलाखतीद्वारे भरण्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित

करण्यात आल्या असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. गट-क संवर्गाची रिक्त पदे उपसंचालकस्तरावरुन व गट-ड संवर्गाची रिक्त पदे जिल्हास्तरावरुन भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**केंद्रेवाडी (जि.बीड) येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता दुसरी मध्ये शिकणा-या विद्यार्थीनीवर अत्याचार झाल्याबाबत**

**(४१) * १६३३२ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रेवाडी (जि.बीड) येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांने इयत्ता दुसरी मध्ये शिकणा-या विद्यार्थीनीवर अत्याचार केल्याची घटना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच याच शिक्षकाने यापूर्वी लैगिंक छळ केल्याच्या तक्रारी चार विद्यार्थीनीनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय. तथापि सदरचे गैरवर्तन इयत्ता ३ रीच्या विद्यार्थीनीच्या बाबतीत घडल्याचे आढळून आले आहे.
(३) व (४) याप्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून संबंधित सहशिक्षक दोषी असल्याचे निष्पन्न झालेले आहे. संबंधिताविरुध्द पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे व संबंधिताना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या दिनांक २३-२-२०१६ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

-----------------

## परळी खोऱ्यातील मौजे सांडवली (दावण) (ता.कराड, जि.सातारा) गावातील महिलेला प्रसूतीसाठी १०८ क्रमाकांच्या रुग्णवाहिका सुविधा देण्यास नकार दिल्याबाबत

**(४२) * १६४०९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी खोऱ्यातील मौजे सांडवली (दावण) (ता.कराड, जि.सातारा) गावातील एका महिलेच्या प्रसूतीसाठी तिच्या कुटुंबियांनी राज्य शासनाच्या १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका सुविधा असलेल्या क्रमांकावर फोन केला असता त्यांनी सदर सुविधा देण्यास नकार दिल्याची घटना माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्यावश्यक सेवा म्हणून गणल्या जाणा-या सार्वजनिक रुग्णवाहिका सेवेस नकार देणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात १०८ क्रमांकावर दुरध्वनी आला नाही. मौजे सांडवली (दावण) येथील एक दुरध्वनी माहे जानेवारीच्या प्रथम सप्ताहात प्राप्त झाला होता असे उपलब्ध अभिलेखावरुन आढळून आले आहे. मौजे सांडवली (दावण) हे गाव ता.कराड, जि.सातारा येथे असून दुर्गम भागात वसले आहे. गाव डोंगरावर असल्याने रुग्णास खाली आणण्यासाठीची विनंती केली होती व तेथे रुग्णवाहीका तयार ठेवली होती. परंतु तसे केल्यास रुग्णांच्या नातेवाईकांनी नकार दिला. सदर गावाचा रस्ता रुग्णवाहीका जाण्यासारखा नव्हता त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मु. पो. चिखली, खु. पो. लांजूड (ता. खामगाव, जि.बुलडाणा) येथील शेतकऱ्याच्या जमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबत

**(४३) * १६६११ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक १२५८७ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु. पो. चिखली, खु. पो. लांजूड (ता.खामगाव, जि.बुलडाणा) येथील श्री.गजानन दामोधार मोरखडे यांची शेती गट क्र. १२६ मौजे पारखेड शिवारात असून त्यांचा शेतीच्या बाजूला सांडवा असल्याने सांडव्याच्या जमिनीवर काही लोकांनी अतिक्रमण केले असल्यामुळे अर्जदाराचा शेतात येणे-जाण्याचा रस्ता बंद झाला असल्याची तक्रार मा.महसूल मंत्री यांचेकडे दि. १३ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे यावर्षीच्या पेरणी पासून वंचित राहिल्यामुळे नुकसान भरपाई मिळावी अन्यथा आत्महत्त्येची परवानगी द्यावी असे निवेदन तहसिलदार, खामगाव यांना वारंवार देऊनही यावर कोणतेही उत्तर न मिळाल्यामुळे शेतकरी हवालदिल होऊन मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ८ ऑक्टोबर २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन पाठवून आत्महत्येची परवानगी मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशतः खरे आहे.

लांजूड लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या सांडव्यावर काही लोकांनी अतिक्रमण केले आहे, परंतू अशा आशयाची तक्रार मा.मंत्री, महसूल यांच्या अभिलेख्यात आढळून आली नाही. तथापि श्री.गजानन दामोदर मोरखडे यांनी मुख्यमंत्री यांना लिहिलेल्या दिनांक १६.७.२०१५ च्या पत्राची प्रत जलसंपदा विभागास प्राप्त झाली आहे.

(२) होय. हे खरे आहे.

श्री.गजानन दामोधर मोरखडे यांचा अर्ज पाटबंधारे उप विभाग, खामगाव यांना दिनांक ८/१०/२०१५ रोजी प्राप्त झाला आहे.

(३) लांजुड लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या सांडव्यात श्री.गणेश वासुदेव बोडखे रा.घाटपुरी यांनी अतिक्रमण केल्यामुळे, अतिक्रमण काढून घेण्याबाबत पाटबंधारे उपविभाग, खामगांव अंतर्गत तांदुळवाडी शाखेमार्फत दिनांक १०/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये पोलीस स्टेशन, खामगांव ग्रामीण येथे संबंधीतांवर रितसर गुन्हा दाखल केला आहे. आता या प्रकल्पाच्या पुच्छ कालव्यावर अतिक्रमण नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रामदेवबाबा यांच्या पतंजली या वनौषधी बनविणाऱ्या कंपनीला राज्यातील वनसंपत्तीचा वापर करण्यास परवानगी देण्याबाबत**

**(४४) * १६६५० श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामदेवबाबा यांच्या पतंजली या वनौषधी बनविणाऱ्या कंपनीला राज्यातील वनसंपत्तीचा वापर करण्यास परवानगी देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधिन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) वनालगत राहणाऱ्या आदिवासी व इतर ग्रामस्थांमार्फत संकलित होणाऱ्या औषधी वनस्पती व अकाष्ठ वनोपजावर प्रक्रिया करुन त्यापासून विविध वनोत्पादने तयार करण्यासाठी गडचिरोली वनवृतांतर्गत प्रायोगिक तत्वावर गोंडवाना हर्बस् प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पामार्फत तयार करण्यात येत असलेल्या विविध वनोत्पादनांची विक्री सद्य:स्थितीत जनधन-वनधन या विक्री केंद्रामार्फत होत आहे. जनधन-वनधन या विक्री केंद्रामार्फत विक्री होत असलेल्या वनोत्पादनांपासून संकलनकर्त्यांना अधिकाधिक आर्थिक फायदा मिळवून देण्याकरिता सदर वनोत्पादनांना व्यापक प्रसिद्धी देवून त्यास जास्तीत जास्त मोबदला प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टिकोनातून पतंजली व इतर आयुर्वेदिक औषधी निर्माण करणाऱ्या संस्थांशी अनौपचारीक चर्चा करण्यात आली आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------------

## राज्यातील मूत्रपिंडाच्या रुग्णांना शासकीय व निमशासकीय रुग्णालयातून अल्पदरात डायलेसीस सुविधा मिळणेबाबत

**(४५) * १६६६७ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मूत्रपिंड विकाराच्या रुग्णांना डायलेसीससाठी सर्व शासकीय, निम-शासकीय रुग्णालयात कमीत कमी खर्चात व बीपीएल कार्डधारकांना मोफत उपचारांची सुविधा उपलब्ध होण्यासाठी अर्थसंकल्पात पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात यावी, अशा आशयांच्या मागणीचे एक निवेदन दि. ३० जानेवारी, २०१५ व तद्नंतर पुन्हा २२ एप्रिल, २०१५ रोजी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे लोकप्रतीनिधीनी दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यातील २१ जिल्हा रुग्णालये, २ विभागीय संदर्भ सेवा रुग्णालये, ४ सामान्य रुग्णालये, ३ उपजिल्हा रुग्णालये व १ स्त्री रुग्णालय अशा एकूण ३१ ठिकाणाच्या रुग्णालयांत डायलेसीस उपचार सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रत्येक डायलेसीस केंद्रामध्ये दारीद्रय रेषेखालील व्यक्ती, ज्येष्ठ नागरीक, शासकीय कर्मचारी तसेच शासन निर्णय दि. २८/१२/२०१५ अन्वये ज्यांना मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत अशा सर्वांना डायलेसीस सेवा मोफत देण्यात येते. तसेच दारीद्रयरेषेवरील व रु. १ लक्ष पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांना ही सुविधा राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत मोफत उपलब्ध करुन दिली जाते, त्याव्यतिरीक्त इतर रुग्णांना सवलतीच्य दरात ही सुविधा उपलब्ध करुन दिली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**शिर्डी (जि.अहमदनगर) येथील मृत व्यक्तिला कचऱ्यांच्या गाडीतून नेल्याबाबत**

**(४६) * १७३९० श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (जि.अहमदनगर) येथील साईबाबा मंदिरातील पिंपळगांव रस्त्याच्या कडेला विठ्ठल नारकर वय ७५ वर्षाच्या निराधार मृत वृध्दाला रुग्णालयात नेताना रुग्णवाहिकेऐवजी चक्क कचऱ्याच्या गाडीतून दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास नेले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषी आढळलेल्या व्यक्तिंवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

शिर्डी (जि.अहमदनगर) येथील साईबाबा मंदिरातील पिंपळगांव रस्त्याच्या कडेला पडलेल्या वृद्धाला साईनिर्माण ग्रुपच्या खाजगी रुग्णवाहिकेतून ग्रामीण रुग्णालय, राहता येथे आणले होते. सदर वृद्धाला कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत घोषित केले.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवरगांव ग्राम पंचायत (जि.चंद्रपूर) येथे महात्मा गांधी ग्रामीण रो.ह.यो. अंतर्गत बोगस मजूर दाखवून केलेला गैरव्यवहार

**(४७) * १५२१८ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.मितेश भांगडिया : तारांकित प्रश्न क्रमांक ११०९२ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवरगांव ग्रामपंचायत (जि.चंद्रपूर) येथे महात्मा गांधी ग्रामीण रो.ह.यो. अंतर्गत सन २०१४-२०१५ या वर्षात कोणतीही कामे न करता संबंधीत ग्राम रोजगार सेवक व ग्राम विस्तार अधिकारी यांनी बोगस मजूर दाखवून लाखो रुपयाचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी अहवालात संबंधीत ग्राम रोजगार सेवक व ग्राम विस्तार अधिकारी हे दोषी आढळून येवूनही अद्यापही संबंधीत अधिकाऱ्यांवर कायदेशिर कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ सप्टेंबर, २०१५ रोजी जिल्हाधिकारी, चंद्रपूर व विभागीय आयुक्त, नागपूर यांना लेखी पत्र देवूनही अद्यापही संबंधीतांवर निलंबनाची कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नाही.

सदर प्रकरणी ग्राम रोजगार सेवक यांना ग्राम रोजगार सेवा या पदावरुन काढण्यात येऊन पोलीस स्टेशन सिंदेवाडी मध्ये कलम ४२०, ४०६, ४६८ व ४७१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तत्कालीन ग्राम विकास अधिकारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे आदेशान्वये जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

ग्राम विकास अधिकारी व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना निलंबित करण्यात आले आहे तसेच एक कंत्राटी तांत्रिक अधिकारी व दोन लिपिक-कम-डाटा एंट्री ऑपरेटर यांना कामावरुन कमी करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नरखेड (जि.नागपूर) येथे रुग्णालयाची स्थापना करण्याबाबत**

**(४८) * १५२४८ श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (जि.नागपूर) येथील ग्रामीण जनतेला आरोग्य सुविधा पुरविण्याकरिता ग्रामीण रुग्णालयाची स्थापना केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नरखेड येथील ग्रामीण रुग्णालयात सोनोग्राफी, शस्त्रक्रियेकरिता लागणारी यंत्र सामुग्री उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुविधा नसल्यामुळे रुग्णांना नागपूरकडे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) निकषानुसार ३० खाटाच्या रुग्णालयासाठी सोनोग्राफी मशिन उपलब्ध नसते. तथापि रुग्णालयात होणाऱ्या मोठया व लहान शस्त्रक्रिया करीता आवश्यक सर्व यंत्रसामुग्री उपलब्ध आहे.

(३) हे खरे नाही.

तथापि, रुग्णांच्या जिवीतास धोका संभवित असल्यास, रुग्णहितार्थ गुंतागुंतीच्या तसेच गंभीर स्वरुपाच्या आजारांमध्ये रुग्णांना जिल्हा स्तरावरील संस्थेत संदर्भित केले जाते.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नंदूरबार जिल्ह्यात तापी नदीवरील बॅरेजचे पाणी**
**उपसा सिंचन योजनेतंर्गत शेतीला देण्याबाबत**

**(४९) * १६३०५ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११६९२ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील २२ सहकारी उपसा सिंचन योजना कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक दुरूस्तीचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेसंबंधीच्या शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील उपसा सिंचन योजना प्रत्यक्ष कार्यान्वयीत होणेसंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप दुरूस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली नसल्यास ती केव्हापर्यंत प्रदान करण्यांत येईल ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) व (४) सदर उपसा सिंचन योजनांच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्यासाठी मा.मंत्रीमंडळ व मा.राज्यपाल यांची मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. त्या मान्यता प्राप्त झाल्यावर सदर उपसा सिंचन योजनांच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे नियोजित आहे.

-----------------

**घाटंजी (जि.यवतमाळ) येथे पैनगंगा नदीवर बांधण्यात**
**येत असलेला निम्न पैनगंगा प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(५०) * १४७४४ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी (जि.यवतमाळ) येथे पैनगंगा नदीवर बांधण्यात येत असलेला निम्न पैनगंगा प्रकल्प शासकीय अकार्यक्षमतेमुळे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या धरणाचे प्राथमिक काम माहे जुलै-२०११ मध्ये सुरु करण्यात आले होते. तथापि, सदर काम दिनांक ७/५/२०१२ रोजी स्थानिक विरोधामुळे बंद करण्यात आले.
(२) प्रकल्पास पर्यावरण, वन तसेच पुनर्वसन व पुर्नस्थापना आराखड्यास केंद्र शासनाच्या संबंधीत विभागाची मान्यता घेणेची कार्यवाही पुर्ण करणेत आली आहे. केंद्रीय जल आयोगाची मान्यता घेणेची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर शहरातील काटोल रोडवर मुलींचे तसेच पाटणकर चौक येथे शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, कनिष्ठ बालगृह व वरिष्ठ बालगृहातील मुलांचा भोजन पुरवठा सुरु करण्याबाबत**

**(५१) * १५७६१ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील काटोल रोडवर मुलींचे तसेच पाटणकर चौक येथे शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, कनिष्ठ व वरिष्ठ बालगृह असून या बालगृहातील २०० मुलांना देण्यात येणारे भोजन, दूध व फळे देणे बंद करण्यात आले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या चार निरीक्षण गृहांना शासनाच्या महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत कंत्राटदार नेमण्यात आले असून, या कंत्राटदारांची चार वर्षापासूनची देयके शासनाकडे थकीत असून सुमारे ६० ते ७० लाखांची देयके शासनाने अदा न केल्याने कंत्राटदारांनी दिनांक १० डिसेंबर, २०१५ पासून बालगृहातील मुलांना भोजन पुरवठा बंद केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या माध्यमातून या वसतीगृहांना निधीचा पुरवठा होत असतानाही अन्नधान्य पुरविणाऱ्या संबंधीत कंत्राटदारांची देयके थकविण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या चारही निरीक्षण गृहातील २०० हून जास्त मुले उपाशी रहाण्यास जबाबदार असलेल्या महिला व बालविकास विभागातील संबंधीत अधिकाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दिनांक १०/१२/२०१५ ते दिनांक १४/१२/२०१५ या कालावधीमध्ये पुरवठाधारकांकडून अन्नधान्य पुरवठा बंद करण्यात आलेला होता. तथापि, दिनांक १५/१२/२०१५ पासून सदर पुरवठा पूर्ववत चालू करण्यात आलेला आहे.
(३) एकात्मिक बाल संरक्षण योजनेकडून निकषाप्रमाणे म्हणजे रु.७५०/- प्रति बालक याप्रमाणे तरतूद वितरीत करण्यात येते मात्र शासकीय संस्थांचा वेतनेत्तर बाबींवरील खर्च त्यापेक्षा अधिक होत असल्यामुळे कंत्राटदारांची देयके थकित राहिलेली होती. नागपूर जिल्ह्यातील कंत्राटदारांना रु.८.८४ लक्ष इतकी तरतूद तात्काळ उपलब्ध करुन दिलेली होती आणि शासन निर्णय दिनांक ८.१.२०१६ अन्वये रु.३१.८० लक्ष एवढा निधी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करण्यात येऊन एकूण रु.४०.६४ लक्ष इतकी रक्कम जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, नागपूर यांना उपलब्ध करुन दिला आहे.
(४) संस्थेमध्ये १ महिना पुरेल एवढा अन्नधान्य साठा उपलब्ध असतो व त्यातूनच मुलांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आल्यामुळे सदर निरीक्षणगृहातील मुले उपाशी राहिलेली नाहीत, त्यामुळे संबंधितांवर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील गावांना कडवा**
**कालव्याचे पाणी पोहचविण्याबाबत**

**(५२) * १६११७ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील कडवा कालव्यास आवर्तन सोडून तीन आठवड्यांचा कालावधी उलटल्यानंतरही सिन्नरच्या पूर्वभागात शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहचत नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी पाटबंधारे खात्याच्या तीन कर्मचाऱ्यांना सुमारे साडेतीन तास मंदिरात डांबुन ठेवल्याची घटना घडल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यांच्या टोकापर्यंत पाणी कालव्याद्वारे पोहचवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) कालवा नुतनीकरणाची कामे हाती घेतलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**केकतपांगरी (ता.गेवराई, जि.बीड) साठवण तलाव योजनेच्या**
**सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाबाबत**

**(५३) * १५९२२ श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक ११८३३ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केकतपांगरी (ता.गेवराई, जि.बीड) साठवण तलाव योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव व्यय व अग्रक्रम समिती पुढे सादर करण्यासाठी जलसंधारण विभागाने वित्त विभागाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००७ पासुन उक्त साठवण तलाव योजनेचे काम अर्धवट अवस्थेत केवळ सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी पुर्ण होवु शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर साठवण तलाव योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळुन योजनेचे काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) केकतपांगरी (ता.गेवराई जि.बीड) साठवण तलाव योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास दिनांक २७/१/२०१६ रोजी संपन्न झालेल्या व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. सदर बैठकीचे कार्यवृत्त दिनांक २३/२/२०१६ चे पत्रान्वये विभागास प्राप्त झालेले असून समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रस्तावास शासनाची मान्यता घेऊन सुधारित प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयातील सूर्या प्रकल्पाच्या कालव्यातून होत असलेली पाणी गळती थांबविण्याबाबत**

**(५४) * १५७५० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील उजव्या कालव्यातून हजारो लिटर पाण्याची गळती होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कालव्याची गळती थांबविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

सुर्या प्रकल्पाच्या कालव्यांची बांधकामे व अस्तरीकरण सुमारे ३०-३५ वर्षे जुने असून कालव्याच्या बांधकामातून काही प्रमाणात गळती होत आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) उपलब्ध निधीतूनच ताप्तुरती डागडुजी करुन सिंचन हंगाम पार पाडण्यात आला.

कोकण सिंचन हंगाम २०१५-१६ साठी दिनांक १७ डिसेंबर, २०१५ पासून सूर्या प्रकल्पातील सिंचन  आवर्तने सुरु करण्यात आली असून आजमितीस नियमित आवर्तने सुरु आहेत. कायम स्वरुपी दुरुस्तीचे अनुषंगाने विशेष दुरुस्ती प्रस्ताव तयार करणे चे काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील दुष्काळी भागामध्ये मजूरांना काम देण्याकरीता मनरेगाच्या योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत**

**(५५) * १६१५९ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने राज्य शासनाच्या माध्यमातून प्रत्येकास काम देण्याकरिता प्रभावीपणे मनरेगाची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत मजूरांना काम देण्याकरीता दुष्काळी भागामध्ये अधिकाधिक योजना राबावी याकरिता बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कार्य सुरु करण्याचे आदेश शासनाने ८० विभागीय दुष्काळ आढावा बैठकीत दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यामध्ये १६३ रस्त्यांसह मनरेगाची ६३३ कामे बंद केली आहेत, हे खरे आहे काय,

(४) सदरील कामे बंद केल्यामुळे मजूरांना काम नाकारल्याने मजूरांची संख्या १६,००० (सोळा हजार) वरुन १५०० (पंधराशे) झाली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर कामे कोणाच्या आदेशावरुन बंद करण्याचा निर्णय घेतला व याची अंमलबजावणी तात्काळ का करण्यात आली नाही,

(६) असल्यास, दुष्काळी परिस्थितीमध्ये कामे वाढण्याऐवजी कामे कमी केल्यामुळे मजूरांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(७) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

(२) होय,

(३) व (४) मनरेगा अंतर्गत कामे बंद करण्याचे आदेश देण्यात आलेले नाहीत. बीड जिल्ह्यात १४०४ रस्त्यांची कामे प्रगतीपथावर असून त्यापैकी चालू साप्ताहीक (दिनांक १८.०२.२०१६ ते २४.०२.२०१६) मध्ये १०९ रस्त्यांच्या कामांचे मस्टर निघाले आहे.

तसेच बीड जिल्ह्यामध्ये चालू साप्ताहीक (दि. १८.०२.२०१६ ते २४.०२.२०१६) ११५७ कामे प्रगतीपथावर असून त्यावर २४,७१९ मजूर कार्यरत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) नाही. सध्या मागणीप्रमाणे कामे दिली जातात. तसेच भविष्यातील मागणीसाठी कामे शेल्फवर ठेवण्यात आली आहेत.

(७) व (८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील दुष्काळी परिस्थिती तसेच स्थानिक संस्था कर (एल.बी.टी.) व टोल रद्द करण्याच्या निर्णयामुळे राज्याची आर्थिक स्थिती ढासळल्याबाबत**

**(५६) * १८११२ प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ११२६० ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळी परिस्थिती स्थानिक संस्था कर (एल.बी.टी.) व टोल रद्द करण्याच्या निर्णयामुळे राज्याची आर्थिक स्थिती ढासळल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक स्थिती बेताची असल्यामुळे अनेक विकासकामांना कात्री लावण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने महसूल वाढीकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३) व (४) राज्य शासनाने परिस्थितीनुसार वेळोवेळी घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने नियोजित खर्चाच्या बाबीच्या प्राथम्यक्रमामध्ये बदल होत असतो. अनावश्यक खर्च कमी करण्याच्या दृष्टीने नवीन पद निर्मिती वर बंदी घालण्यात आलेली आहे. उद्योगासाठी वीजेवरील अनुदान कमी केले आहे व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी सुसंगत अशी कार्यवाही करुन सर्व व्यक्तीगत लाभार्थी योजना आधारशी जोडून लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँकेतील खात्यात परस्पर जमा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमातंर्गत उपसा सिंचन योजनेद्वारे शेततळी भरण्याबाबत**

**(५७) * १५१४५ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमातंर्गत केंद्र शासनाने विदर्भातील जिल्हयाकरिता ३२५० कोटी रुपयांचे पॅकेज जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यक्रमातंर्गत उपसा सिंचन योजनेद्वारे शेततळी भरण्यासाठी अकोला तालुक्यातील ९ गावातील शेतक-यांनी ३६ गट स्थापन करुन प्रस्ताव कार्यकारी अभियंता (जलसंधारण) यांचेकडे सादर करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावातील मंजूर कामांना दिनांक २० फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्या सुमारास स्थगिती देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मंजूर कामांना स्थगिती देण्यामागची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, सदर योजना मंजूर झाल्यास खारपाणपट्टयातील ३ हजार एकर शेती ओलीताखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय.

(३) नाही. तथापि, शासनाने दिनांक २०/२/२०१४ च्या पत्रान्वये मंजूर केलेल्या DPR मध्ये अन्य काही उपचारा सोबत अस्तित्वातील शेततळी उपसा सिंचनाने भरणे व नवीन शेततळी खोदून उपसा सिंचनाने भरणे या उपचारांचा समावेश केलेला नाही.

(४) लघुसिंचन (जलसंधारण) च्या मंजूर रु. १४५० कोटी कार्यक्रमापैकी रु. ९०० कोटी रकमेचे तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) मंजूर असून केंद्र शासनाकडून पूरेसा निधी प्राप्त न झाल्याने व मंजूर डीपीआर मधील कामे मोठ्या प्रमाणात अपूर्ण असल्याने नवीन कामांना तुर्त मंजुरी न देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(५) तसे निश्चित झाले नाही.

(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील ४३७ बालके कुपोषणग्रस्त असल्याबाबत

**(५८) * १४६९३ श्री.विजय उर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालकांच्या सुदृढ आरोग्यासाठी शासनाने कोटयवधी रुपये खर्च करुनही नागपूर जिल्ह्यातील ४३७ बालके कुपोषणग्रस्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाकडून गरजू महिला व बालकांसाठी विविध योजना राबविल्या जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या निधीचा योग्य वापर केला जातो किंवा नाही यांची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाची आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत नागपूर जिल्हयात माहे डिसेंबर, २०१५ च्या मासिक प्रगती अहवालानुसार ० ते ६ वर्षाची एकुण बालके १४००५७ असून त्यापैकी १३६१५७ (९७.२१%) बालकांची वजने घेण्यात आली. त्यामध्ये सर्वसाधारण बालके १३५६१६ (९९.६०%) मध्यम कुपोषित (MAM) बालके ४३७ (०.३२%) व तीव्र कुपोषित (SAM) बालके १०४ (०.०७%) एवढी आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील सर्व बालके, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना घरपोच आहार (THR) तसेच ३ वर्षे ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहाराचा पुरवठा करण्यात येत आहे. याशिवाय जिल्हा परिषद सेस फंड योजना व जिल्हा वार्षिक योजनेच्या अनुदानातुन कुपोषित बालकांसाठी तसेच गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांसाठी अतिरिक्त आहाराकरीता पुरेशी तरतूद करण्यात आलेली आहे.

याशिवाय एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत आरोग्य तपासणी, लसीकरण, संदर्भ सेवा, अनौपचारीक पूर्व शालेय शिक्षण, पोषण व आरोग्य शिक्षण व पुरक पोषण आहार या सेवा नियमितपणे पुरविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यात वन्य प्राण्यांपासून पिकांचे, फळझाडांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याच्या निर्णयाबाबत**

**(५९) * १६२६२ श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राजेंद्र जैन, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन्य प्राण्यांपासून पिकांचे, फळझाडांचे नुकसान झाल्यास त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय शासनाने दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

वन्यप्राण्यामुळे पिकांचे, फळझाडांचे नुकसान झाल्यास संबंधित शेतकऱ्यास नुकसान भरपाई देण्याचा निर्णय प्रथमत: सन २००४ साली घेण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक ३.०८.२००४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तदनंतर शासनामार्फत नुकसान भरपाईच्या रकमेत वेळोवेळी दर वाढ करण्यात आली आहे.

(२) सद्यस्थितीत प्रचलित शासन निर्णयान्वये संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील जलयुक्त अभियानासाठी मूळ आराखड्यानुसार अनुदान देण्याबाबत**

**(६०) * १४९५२ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलयुक्त अभियान राबविण्यासाठी नाशिक जिल्ह्याचा रुपये ३१०.४९ कोटींचा आराखडा असतांनाही सर्व यंत्रणांकडून रुपये ६४.४३ कोटीच निधी उपलब्ध होणार असल्यामुळे रुपये १२४.७३ कोटी रकमेच्या तफावतीमुळे सदर अभियानातील कामे मूळ आराखड्यानुसार होणार नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील जलयुक्त अभियानाकरिता यंत्रणांकडील नियमित अनुदानाव्यतिरिक्त फक्त रुपये ५०.४३ कोटी निधी मंजूर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलयुक्त अभियानासाठी मूळ आराखड्यानुसार अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवड करण्यात आलेल्या गावांचा रु. २६५.७० कोटी रुपयांचा सुधारित आराखडा तयार करण्यात आला असून विविध योजनेंतर्गत रु. १७२.७३ कोटी निधी उपलब्ध होणार आहे. आराखड्यातील कामे पूर्ण करण्यासाठी रु. ९२.९८ कोटी निधीची अतिरिक्त आवश्यकता आहे.
(२) हे ही खरे नाही.
सन २०१५-१६ मधील गावांकरिता जलयुक्त शिवार विशेष निधीतून नियमित अनुदानाव्यतिरिक्त एकूण ६१.०९ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला.
(३) सन २०१५-१६ मधील गावांकरिता जलयुक्त शिवार विशेष निधीतून रु. ६१.०९ कोटी निधी उपलब्ध करुन दिला असून एप्रिल २०१६ मध्ये आणखी रु. १५.२७ कोटी निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

-----------------

**गंगाखेड तालुक्यात (जि.परभणी) रोहयो अंतर्गत**
**वृक्ष लागवडीत झालेला गैरव्यवहार**

**(६१) * १५०४८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेमार्फत गंगाखेड तालुक्यातील (जि.परभणी) वृक्ष लागवडीत तहसीलदार शिंगटे, सामाजिक वनीकरण विभागाचे श्री.निर्मळ, श्री.रासने व इतरांनी गैरप्रकार केल्याने व घेतलेल्या चुकीच्या निर्णयामुळे शासनाचा ४६ लक्ष रूपयांचा खर्च बुडीत जात असल्याचा आक्षेप मग्रारोहयोचे तक्रार निवारण अधिकारी डॉ. अखिल यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांना दिलेल्या सन २०१५-१६ अहवालात नोंदविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चुकीच्या पद्धतीने प्रशासकीय मंजुऱ्या तसेच प्रत्यक्षात कामे न करताच वृक्ष लागवड दाखविणे व इतर गैरप्रकार करणाऱ्या वरील सर्व अधिकाऱ्यांविरुद्ध रोहयो कायदयाप्रमाणे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) या प्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हे नोंदविण्यात आलेले नाहीत.

मात्र सदर प्रकरणी तहसीलदार, गंगाखेड, तत्कालीन लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, गंगाखेड व लागवड अधिकारी, गंगाखेड यांच्यावर प्रत्येकी रु. १,०००/- दंड आकारण्यात आला आहे.

तसेच सदर अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदूर्ग जिल्हयातील आरोग्य यंत्रणेची दूरवस्था दूर करण्याबाबत

**(६२) * १८०७१ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११९४८ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील नागरिकांना योग्य त्या आरोग्य सेवेचा लाभ मिळत नसल्याने रुग्णांना खर्च करुन गोवा राज्यात जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमधील त्रुटी दूर करण्याबाबत व आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) सिंधुदूर्ग जिल्हयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची वर्ग-१ ची २८, वर्ग-२ ची ८६ व वर्ग-३ ची ३ पदे अशी एकूण ११७ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या मंजूर पदापैकी वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-३ ची किती पदे रिक्त आहेत,

(५) असल्यास, सदर रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच उपजिल्हा रुग्णालय, सावंतवाडी व ग्रामीण रुग्णालय, मालवण येथील अधिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(७) जिल्हयातील आरोग्य यंत्रणा सुस्थितीत आणण्यासाठी शासनाने कोणत्या प्रकारचा कृती कार्यक्रम हाती घेतला आहे अथवा घेणार आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

सिंधुदूर्ग जिल्हयातून मुंबई-गोवा हा राष्ट्रीय महामार्ग जातो या कारणाने महामार्गावर झालेल्या अपघाताचे व्यक्तींना उपचारासाठी रुग्णालयात आणले जाते. बऱ्याच वेळा रुग्णांना मेंदूला इजा झालेली असते अशा गंभीर रुग्णांना न्यूरोसर्जरी या विशेषतज्ञ सेवेची आवश्यकता असते. सदरची सुविधा जिल्हयातील शासकीय किंवा खाजगी रुग्णालयात नसल्याने रुग्णांना पुढील उपचारार्थ शासकीय महाविद्यालय गोवा येथे संदर्भित करण्यात येते. सदरची सेवा ही शासकीय रुग्णवाहिकेतून मोफत देण्यात येते, याचा कुठलाही आर्थिक भुर्दंड रुग्णांना होत नाही.

(२) जिल्ह्यात १ जिल्हा रुग्णालय, ३ उपजिल्हा रुग्णालय व ७ ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहेत. तेथील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) हे खरे आहे.

(४) गट-अ, गट-ब, गट-क मिळून ५१ पदे रिक्त आहेत.

(५) सदर रिक्त पदे तात्काळ भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) व (७) उपजिल्हा रुग्णालय, सावंतवाडी व ग्रामीण रुग्णालय मालवण येथील अधिक्षकांची पदे भरलेली आहेत. त्यापैकी सावंतवाडी येथील वैद्यकीय अधिक्षक नियमित कार्यरत आहेत व मालवण येथील गेले दोन वर्षे कर्तव्यावर अनधिकृत गैरहजर आहेत. त्यांचे विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पोही वन विभागाच्या (ता. कर्जत जि.रायगड) लाकडे ठेवण्याच्या डेपोजवळ सुरक्षा व्यवस्था तैनात करण्याबाबत**

**(६३) * १५६७४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोही वन विभागाच्या (ता. कर्जत, जि.रायगड) लाकडे ठेवण्याच्या डेपोमध्ये इतर प्रकारच्या लाकडासह मौल्यवान असे सागवान आणि रक्तचंदनचाही साठा असून या डेपोजवळ कोणतीही सुरक्षा व्यवस्था तैनात नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जतमध्ये वन विभागाचे तीन भाग असून सदर वन विभागामध्ये जप्त करण्यात आलेली लाकडे लिलाव होईपर्यंत पोही डेपोत ठेवण्यात येत असून सुरक्षा व्यवस्था नसल्याने लाकडे चोरीला जाण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) सुरक्षा व्यवस्थेसाठी दिवसपाळीत व रात्रपाळीत वनमजूर संरक्षणाचे काम करित आहेत. त्या व्यतिरिक्त कर्जत वनक्षेत्रातील वनपाल-१, वनरक्षक-२ व वनमजूर- १ असे ४ वनकर्मचारी दररोज आळीपाळीने रात्र गस्तीत संरक्षणाचे काम करित आहेत. सध्या पोही विक्री आगारावर रक्तचंदन माल नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील वेगवर्धित प्रकल्प योजनेंतर्गत १४ प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(६४) * १५३८४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एआयबीपी (वेगवर्धित प्रकल्प) योजनेसाठी शासनाने केंद्र शासनाकडे पाठविलेल्या सुमारे १६५६ कोटी रुपये खर्चाच्या २१ प्रकल्पांच्या प्रस्तावांपैकी केवळ ७ प्रस्तावांना मंजूरी दिलेली असून १४ प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ७ प्रस्तावांना किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे व त्याचा विनियोग कशा प्रकारे करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उर्वरित १४ प्रकल्पांना केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय. सन २०१४-२०१५ मध्ये २१ प्रकल्पांचे रु.१६५६ कोटी केंद्रीय अर्थ सहाय्याचे प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आले होते. यापैकी ७ प्रकल्पांना सन २०१४-२०१५ मध्ये केंद्रीय अर्थ सहाय्य प्राप्त झाले.

(२) सन २०१४-२०१५ मध्ये सादर २१ प्रकल्पाच्या प्रस्तावापैकी ६ प्रकल्पांना रु.९.५० कोटी व १ प्रकल्पास सन २०१३-२०१४ च्या सलगता प्रस्तावाच्या अनुषंगाने रु.२२.५० कोटी असे एकूण मिळून ७ प्रकल्पांना सन २०१४-२०१५ मध्ये रु.३२ कोटी केंद्रीय अर्थ सहाय्य प्राप्त झाले. सन २०१५-२०१६ मध्ये, सन २०१४-२०१५ मध्ये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ६ प्रकल्पांना

रु.१००.९५ कोटीचे केंद्रीय अर्थ सहाय्य प्राप्त झाले. तथापि प्रकल्पाची कामे सुरळीतपणे चालू रहावित यासाठी राज्य शासनाने प्रकल्पांसाठी प्राप्त केंद्रीय हिस्सा व राज्य शासनाच्या निधीतून सन २०१४-२०१५ रु.३६५ कोटी व सन २०१५-२०१६ मध्ये रु.८२२ कोटीचा निधी वितरीत केला आहे.

(३) मा.मुख्यमंत्री/मा.मंत्री (जलसंपदा) यांचे स्तरावरुन केंद्रीय हिस्सा वितरीत व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात आले.

राज्य शासनाने प्रकल्पांची कामे चालू रहावीत यासाठी या १४ प्रकल्पांसाठी राज्य निधीतून सन २०१४-१५ मध्ये रु.१०२९ कोटी व सन २०१५-२०१६ मध्ये रु.१४८९ कोटीचा निधी वितरीत केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात पसरणाऱ्या स्वाईन फ्ल्यूला प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत**

**(६५) * १५५१३ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.शरद रणपिसे, श्री.माणिकराव ठाकरे : तारांकित प्रश्न क्रमांक १२१३८ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई वगळता उर्वरित राज्यात स्वाईन फ्ल्यूचा प्रसार वेगाने होत असून जानेवारी महिन्यापासून ५८६ रुग्णांचा मृत्यू झाला व ऑक्टोबर, २०१५ मध्ये आजाराने एकंदर ४५ रुग्ण मृत्यूमुखी पडले व पॉझिटिव्ह रुग्ण ५९०० असल्याचे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

- मुंबई वगळता राज्यात माहे जानेवारी, २०१५ ते डिसेंबर, २०१५ अखेर ८३५ मृत्यू व ४९८१ पॉझिटिव्ह रुग्ण होते.
- मुंबई वगळता राज्यात ऑक्टोबर, २०१५ मध्ये ९८ मृत्यु व ३८८ पॉझिटिव्ह रुग्ण होते.

(२) स्वाईन फ्ल्यू प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी मुख्यत्वे खालील कार्यवाही करण्यात येत आहे.

- फ्ल्यू सदृश्य रुग्णांचे नियमित सर्वेक्षण
- रुग्णांवर वर्गीकरणानुसार विनाविलंब उपचार.
- उपजिल्हा रुग्णालयात तसेच वैद्यकीय महाविद्यालय यांच्या रुग्णालयात विलगीकरणे कक्षाची स्थापना.
- उपचार सुविधा असणाऱ्या सर्व खाजगी रुग्णालयांना स्वाईन फ्ल्यू उपचाराची मान्यता.
- आर्थिकदृष्टया दुर्बळ गटातील स्वाईन फ्ल्यू रुग्णांचा व्हेंटीलेटरवरील वैद्यकीय खर्चाची शासनामार्फत प्रतिपूर्ती करण्यासाठी मुख्यमंत्री निधीतून तरतुद.
- राज्यातील ४ शासकीय प्रयोगशाळा मार्फत मोफत निदान सुविधा.
- खाजगी प्रयोगशाळांना मान्यता देण्यासाठी तज्ञ समित्यांची स्थापना.
- ऑसेलटॅमीवीरचा पुरेसा साठा.
- दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीतील गरोदर मातांसोबतच मधुमेह, उच्च रक्तदाब असणाऱ्या व्यक्ती व आरोग्य कर्मचारी यांना स्वाईन फ्ल्यू प्रतिबंधक लसीकरण.
- महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समितीची स्थापना.
- अन्न व औषध विभागामार्फत सर्व एक्स शेड्युल्डधारक औषध दुकानांमध्ये ऑसेलटॅमीवीर उपलब्ध.
- शासकीय आणि खाजगी डॉक्टरांच्या स्वाईन फ्ल्यू कार्यशाळा.
- फ्ल्यू प्रतिबंधासाठी जनतेचे आरोग्य शिक्षण.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे आलोंडा ग्रामपंचायतीच्या हद्दीत (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(६६) * १५६८५ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आलोंडा ग्रामपंचायतीच्या हद्दीत (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील रोजगार हमी योजनेच्या कामात बोगस मजूर दाखवून खोटी हजेरीपत्रके तयार करुन गैरव्यवहार घडल्याची नोंद सामाजिक संघटनेने जिल्हाधिकारी (पालघर) यांच्याकडे पत्राद्वारे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

मौजे आलोंडे ग्रामपंचायत, ता.विक्रमगड येथील रोहयो कामांबाबत चौकशी करुन कारवाई करण्याची विनंती करणारे निवेदन श्रमजीवी संघटना-महाराष्ट्र यांनी दि.२७.११.२०१५ रोजी जिल्हाधिकारी पालघर यांचेकडे सादर केले आहे.

(२) जिल्हाधिकारी कार्यालयाने, याप्रकरणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना सखोल चौकशी करुन वस्तुस्थितीनिहाय अहवाल सादर करण्याविषयी कळविले आहे. त्यानुसार चौकशी अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी याप्रकरणी श्री.विश्वनाथ पिंपळे, गट विकास अधिकारी (उ.श्रे.), पंचायत समिती, विक्रमगड यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

(३) अशी बाब नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात जन्मलेल्या मुलांच्या प्रमाणात मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढविण्याबाबत

**(६७) * १८०५०  ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे एप्रिल-मे, २०१५ पासून डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत कालावधीत सिंधुदुर्ग जिल्ह्यात जन्मलेल्या मुलांच्या प्रमाणात मुलींच्या जन्माचे प्रमाण सुमारे ३० टक्के टक्क्यांनी कमी झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची कारणे काय आहेत,

(३) मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढविण्यासंदर्भात कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढविण्यासाठी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण ६९ सोनोग्राफी केंद्रे नोंदणीकृत व कार्यरत असुन सर्व सोनोग्राफी केंद्रांची तालुका समुचित प्राधिकारी यांच्यामार्फत दर तिमाही सखोल तपासणी करण्यात येते. आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय तिमाही मध्ये सर्व सोनोग्राफी केंद्राची तालुका समुचित प्राधिकारी यांच्या मार्फत १०० टक्के तपासणी करण्यात आली असून जानेवारी-फेब्रुवारी, २०१६ पर्यंत एकूण ४५ सोनोग्राफी केंद्रांची तपासणी झालेली आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण आठ तालुक्यात तालुका पातळीवर एकूण १६ (आठ वैद्यकिय अधिक्षक व आठ तहसिलदार) तालुका समुचित प्राधिकारी कार्यरत आहेत. तसेच जिल्हापातळीवर जिल्हाधिकारी व जिल्हा शल्य चिकीत्सक हे जिल्हा समुचित प्राधिकारी कार्यरत आहेत. समुचित प्राधिकारी यांच्यामार्फत सोनोग्राफी केंद्रावर डिकॉय केस पाठवून गर्भ लिंग निदान होते किंवा कसे यांची खातर जमा केली जाते.

सिंधुदूर्ग जिल्ह्यात जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सल्लागार समिती कार्यरत आहे. सदर सभेमध्ये गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायद्याअंतर्गत बाबींसाठी सल्लामसलत करुन योग्य कार्यवाही करण्यात येते.

जिल्हा स्तरावर मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय दक्षता पथकाची स्थापना करण्यात आली असून सदर समितीच्या सभा घेण्यात येऊन गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायद्याच्या अंमलबजावणीबात आढावा घेण्यात येतो.

सर्वसामान्य जनतेला तक्रार नोंदविण्यासाठी www.amchmulgi.gov.in हे संकेत स्थळ व टोल फ्री हेल्प लाईन सुरु करण्यात आली आहे.

जिल्हयातील सर्व प्रसुती केंद्रामध्ये दरमहा मुलामुलींचे जन्म लिंग गुणोत्तर प्रमाण फलक लावण्यात आले आहेत.

सिंधुदूर्ग जिल्हयामधील समुचित प्राधिकारी यांना गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायद्याबाबत मार्गदर्शक करण्याकरीता जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा आरोग्य यंत्रणेमार्फत मुलगी वाचवा, देश वाचवा या विषयावर जनसामान्यांमध्ये जनजागृती होण्याकरीता निबंध, वक्तृत्व, चित्रकला स्पर्धा, पथनाट्य, चित्ररथ तसेच इतर विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करुन जनजागृती करण्यात आलेली आहे.

-----------------

**नांदेड जिल्हयात सिंचन विहिरींच्या नोंदी पंचनामे न करता सात बारावर घेतल्याबाबत**

**(६८) * १५०६८ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव (जि.नांदेड) तालूक्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरींच्या नोंदी तलाठ्यांनी पंचनामे केल्याशिवाय सात बारा उताऱ्यावर घेऊ नयेत असे आदेश जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सर्व संबंधितांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिंचन विहिरींचे पंचनामे न करता त्याची ७/१२ वर नोंद घेवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा प्रकार माहिती अधिकारातील माहितीवरून माहे डिसेंबर-२०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हदगाव तालुक्यातील ८५ विहिरी पूर्ण झाल्याची व त्या विहिरी सात बारा उताऱ्यावर घेतल्याचा अहवाल उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना यांना तहसील कार्यालय, हदगाव यांनी पाठविला, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या विहिरींची नोंद सात बारा उताऱ्यावर करण्यापूर्वी तलाठ्यामार्फत पंचनामे करण्यात आले होते काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही, तथापि याबाबत प्राप्त झालेल्या निवेदनावर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना कळविण्यात आले होते.
(२) हे खरे नाही.
(३) हदगाव तालुक्यात मग्रारोहयो अंतर्गत ७५ विहिरी पूर्ण झाल्या असून ३८ विहिरींची नोंद ७/१२ वर घेण्याची कार्यवाही सुरु असलेबाबत तहसिलदार, हदगाव यांनी Email द्वारे कळविले आहे.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ९ जिल्हा परिषदांच्या ४४९ लघुसिंचनाची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(६९) * १५००५ श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ९ जिल्हा परिषदांच्या ४४९ लघुसिंचनाच्या कामांच्या वेळेत व किंमतीत वाढ झाल्याचे कॅगच्या अहवालात नमूद केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लघुसिंचनाची कामे पुर्णत्वास नेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्धतेनुसार कामांचे नियोजन करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर देवलापार वनपरिक्षेत्रातील जुनेवानी बीट क्र.४९२ येथे वन कर्मचाऱ्यांना पट्टेदार वाघ मृतावस्थेत निदर्शनास आल्याबाबत**

**(७०) * १५९६७ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.राजेंद्र जैन, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर देवलापार वनपरिक्षेत्रातील जुनेवानी बीट क्र.४९२ येथे दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास वन कर्मचा-यांना पट्टेदार वाघ मृतावस्थेत निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मृत वाघाशेजारीच रान डुक्कर व चितळसुद्धा मृतावस्थेत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वाघाचा तसेच इतर प्राण्याचा मृत्यु नेमका कशामुळे झाला याची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीत अंती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) पशुवैद्यकीय अधिकारी यांनी मृत वाघाचे शवविच्छेदन केले असून वाघाच्या मृत्यचे संभाव्य कारण “haemorrhagic shock” असे नमूद केले आहे, तसेच रानडुक्कर व चितळाचा मृत्यू मांसभक्षी वन्यप्राण्याने मारल्यामुळे झालेला असल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद केले आहे.

-----------------

**वर मलवडी (ता.माण, जि.सातारा) येथील पाणलोट क्षेत्र कार्यक्रमात मंडळ कृषी अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार**

**(७१) * १६०८२ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर मलवडी (ता.माण, जि.सातारा) येथील पाणलोट क्षेत्र कार्यक्रमात मंडळ कृषी अधिकारी यांच्या गैरव्यवहाराबाबत वर मलवडी ग्रामस्थांनी आझाद मैदान, मुंबई येथे आंदोलन करीत असल्याचे निवेदन दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.कृषी मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर मलवडी परिसरात पाणलोट मार्फत मंडल अधिकारी कृषी पर्यवेक्षक यांनी क/ब माती नाला बांध, सिमेंट बंधारे, सी.सी.टी. लुज बोल्डर कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी काय निष्पन्न झाले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) व (३) प्राथमिक चौकशी उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून करण्यात आली. तसेच आता दक्षता पथकामार्फत चौकशी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हयातील तोंडापुर व नजीकच्या अजिंठा पर्वत रांगेत होणारी अवैध वृक्षतोडीबाबत

**(७२) * १५१६१ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हयातील तोंडापुर व नजीकच्या अजिंठा पर्वत रांगेतील वृक्षांची बेसुमार अवैध तोड होत असून यामुळे आजूबाजूच्या मानव वस्तीकडे जंगलातील हिंस्त्र प्राणी यायला लागलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावरखेड (जि.अमरावती) येथील बाधित शेतकऱ्यांना इंडिया बुल्स कंपनीकडून नुकसानभरपाई मिळण्याबाबत

**(७३) * १५६६५ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील सावरखेड येथील महामार्गालगतच्या शेतकऱ्यांच्या शेतीतून अप्पर वर्धा धरणावरुन सोफिया प्रकल्पाला पाणी पुरविण्यासाठी पाईपलाईन टाकण्यात आली आहे. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांनी याची भरपाई इंडिया बुल्स कंपनीकडून मिळावी नाही तर त्यांना सामूहिक आत्महत्येची परवानगी व्हावी असे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाधित शेतकऱ्यांना इंडिया बुल्स कंपनीकडून नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन प्राप्त आहे.

(२) उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे जलाशयातून पाणी उपलब्ध करुन देणेचे मर्यादेतच शासनाचा यामध्ये सहभाग आहे. कंपनीने टाकलेल्या पाईप लाईनशी शासनाचा संबंध नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे रुग्णालयात स्क्रिझोफेनिया व भयगंडाच्या रुग्णांची संख्या वाढल्याबाबत

**(७४) * १५५४४ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे रुग्णालयात २०१४ व २०१५ या वर्षात स्क्रिझोफेनियाचे अनुक्रमे १७ हजार ८३९ व १९ हजार रुग्णांची नोंद झाली व सन २०१४ मध्ये भयगंडाचे १५४८ रुग्ण दाखल झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील मानसिक आजार आटोक्यात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे येथे सन २०१४ मध्ये स्क्रिझोफेनीयाचे नवीन बाह्यरुग्ण १६४६ तर नवीन आंतररुग्ण ८५१ असे एकुण २४९७ रुग्ण व सन २०१५ मध्ये नवीन बाह्यरुग्ण १४११ तर नवीन आंतररुग्ण ९४८ असे एकुण २३५९ रुग्णांची नोंद झाली आहे. या कालावधीत भयगंडाच्या रुग्णाची संख्या निरंक आहे.

(२) मनोरुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसार सर्व रुग्णांवर आवश्यक तो औषधोपचार करण्यात येतो.

मानसिक आजार आटोक्यात आणण्यासाठी मानसिक रोग उपचार तज्ञ व सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत रुग्णांचे समुपदेशन करण्यात येते.

तसेच एकत्रित चर्चा सत्र आयोजित करणे, पथनाट्य व पोस्टर प्रदर्शन, शालेय मानसिक आरोग्य तपासणी यासारखे कार्यक्रम राबवुन रुग्ण, त्यांचे नातेवाईक व जनसामान्यांना या आजारासंबंधी आणि त्यावरील उपचाराबाबतची माहिती देण्यात येवुन, मानसिक आजार आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### मौजे म्हस्केवाडी (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथे बिबट्याच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू झाल्याबाबत

**(७५) * १५८६४ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.राजेंद्र जैन :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे म्हस्केवाडी (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथे बिबट्याच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मृत महिलेच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रचलित शासन निर्णयाच्या तरतूदीनुसार मृत महिलेच्या कायदेशीर वारसास आर्थिक मदत म्हणून रु. ८.०० लाख देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नातेपुते (जि.सोलापूर) नजीकहून वाहणारा निरा उजवा कालव्याचे पाणी शेतकऱ्यांना शेतीसाठी देण्याबाबत**

**(७६) * १५५२२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नातेपुते (जि.सोलापूर) नजीकहून वाहणारा निरा उजवा कालवा १७ नोव्हेंबर रोजी सुरु झाला असून या कालव्याचे पाणी अद्यापही फाटा क्रमांक ४४ ला सोडलेले नसल्याने या फाटयावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांची पिके जळून गेल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी नसल्याबाबत**

**(७७) * १५१९० श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात कोरची, सिरोंचा, मुलचेरा, आष्टी, धानोरा तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अतिदुर्गम नक्षल प्रभावित जिल्ह्यात श्रेणी १ च्या ७ पदांचा श्रेणी २ च्या २४ पदांचा व श्रेणी ३ च्या १४ पदांचा पद अनुशेष आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे वैद्यकीय यंत्रणा अपुरी पडत असून सामान्य नागरिकांना आरोग्याबाबत फार त्रास सहन करावा लागत आहे व महागड्या खाजगी रुग्ण सेवेकरिता गडचिरोली जिल्ह्यात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अतिदुर्गम नक्षल प्रभावित जिल्ह्यात श्रेणी १ श्रेणी २ व श्रेणी ३ च्या पदांचा अनुशेष त्वरित भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) गडचिरोली जिल्ह्यातील कोरची, सिरोंचा, मुलवेरा, आष्टी, धानोरा येथील ग्रामीण रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी गट अ संवर्गाची एकुण १५ पदे मंजूर असुन त्यापैकी १३ पदे भरलेली व २ पदे रिक्त आहेत.

(२) गडचिरोली जिल्ह्यामधील एकुण ९ ग्रामीण रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिक्षक (वर्ग-१) संवर्गाची ७ पदे, वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची ३ पदे व गट-क संवर्गाची ४६ पदे रिक्त आहेत.

(३) हे खरे नाही.

उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कंत्राटी वैद्यकीय अधिकारी व बंधपत्रीत वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना आवश्यक रुग्णसेवा पुरवण्यात येत आहे.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. वैद्यकीय अधिकारी गट अ संवर्गाच्या रिक्त पदांवर

अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. तसेच गट-क संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही उपसंचालकस्तरावर सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सुधारगृहात असलेल्या बालगुन्हेगारांना शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक प्रवाहात आणण्याबाबत

**(७८) * १५४५२ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुधारगृहात असलेल्या बालगुन्हेगारांना शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक प्रवाहात आणण्याचे प्रयत्न करावेत असे मुंबई उच्च न्यायालयाने राज्य शासनास सूचना केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

राज्यातील सुधारगृहात असलेल्या बाल गुन्हेगारांना शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक प्रवाहात आणण्याचे प्रयत्न करावेत असे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये PIL(L) ८१/२०१५ कमल जगदीश सिंग विरुद्ध दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी, माहिम मुंबई या प्रकरणामध्ये मुंबई मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनांस सूचना केली होती.

(२) प्रस्तुत प्रकरण मा.उच्च न्यायालयात दाखल असून न्यायालयाच्या निदेशास अनुसरुन याबाबत सर्वंकष आर्थिक व धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. मात्र सद्य:स्थितीत शासन निर्णय क्र.जेजेए-२००६/प्र.क्र.४२१/का-अ दिनांक ४.८.२००७ अन्वये राज्यातील सर्व निरीक्षणगृहे, विशेषगृहे, अनुरक्षणगृहे, शासकीय बालगृहे, शासकीय संरक्षणगृहांमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत आयटीआय व्यवसाय प्रशिक्षण योजना सुरू करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

याशिवाय १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रवेशितांच्या पुनर्वसनाच्यादृष्टीने पीपीपी मार्फत कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबन पुनर्वसन योजनादेखील राज्यशासनाकडून चालविली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील टिपेश्वर अभयारण्यास व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा मिळण्याबाबत**

**(७९) * १७३८३ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील टिपेश्वर अभयारण्य येथे व्याघ्र प्रकल्प होण्याबाबत तेथील जनतेनी तसेच जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी गेली अनेक वर्षांपासून मागणी शासनाकडे करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) टिपेश्वर (वन्यजीव) अभयारण्याला व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा मिळावा अशा आशयाचे प्रा. राजु तोडसाम, विधान सभा सदस्य यांनी दिनांक १२.०२.२०१६ रोजी मंत्री (वने) यांनी निवेदन दिले आहे.

(२) उक्त मागणी नुसार व्याघ्र प्रकल्प करता येईल किंवा कसे ? याची तपासणी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाशी येथील सेक्टर ३१ मधील बंजारा व इतर समाजाच्या कुटुंबाची घरे पूर्वसूचना न देता निष्कासित केल्याबाबत**

**(८०) * १४६१९ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी, येथील सेक्टर ३१ मधील २० वर्षापासून वास्तव्य करीत असलेले बंजारा व इतर समाजाची जवळपास २०० कुटुंबाची घरे वनविभाग व सिडकोनी मिळून पूर्व सूचना न देता निष्कासित केल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर कुटूंबांना नुकसान भरपाई देण्यासाठी तसेच त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) वाशी (नवी मुंबई) येथील राखीव वने म्हणून अधिसूचित क्षेत्रातील सर्वे क्र.१७ सेक्टर ३१/अ मध्ये अतिक्रमण करुन बांधण्यात आलेल्या एकूण ६६ अनधिकृत झोपड्या निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. सदर अनधिकृत झोपड्या निष्कासित करण्यापूर्वी प्रथम ६६ अनधिकृत झोपडीधारकांना नोटीसा देण्यात आल्या होत्या.
(२) प्रत्यक्ष स्थळपाहणी, सन २००५ चा हाय रिझॉल्युशन इमेजचा MRSAC ने पुरविलेला नकाशा आणि गुगल इमेजचा आधार घेऊन वन विभागाच्या ताब्यातील मौजे वाशी (नवी मुंबई) येथील राखीव वने म्हणून अधिसूचित क्षेत्रातील बेकायदेशीर अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(३) व (४) मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.३२४६/२००४ रुपांतरीत जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये राज्य शासनाला कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता उपाययोजना करण्याचे सूचना दिल्या होत्या. त्याकरिता मा.उच्च न्यायालयाने कांदळवन व कांदळवनापासून ५० मी अंतरावर बांधकामे करण्यास प्रतिबंधीत केले आहे. सदर न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. कार्यवाही कायदेशीर असल्याने पुनर्वसन आणि नुकसान भरपाई देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## जवाहर रोजगार योजनेतून घेण्यात येणाऱ्या विहिरीच्या जाचक अटी रद्द करण्याबाबत

**(८१) * १५४८७ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने सुरु केलेल्या जवाहर रोजगार योजनेतून घेण्यात येणाऱ्या विहिरीच्या काही जाचक अटी (६० आर क्षेत्र अट रद्द करून १ ते २ आर क्षेत्रास परवानगी द्यावी व दोन्ही विहिरीचे अंतर ५०० फूट रद्द व्हावी) रद्द करण्यात यावी, तसेच, मस्टर व जॉब कार्ड बंद करुन शाखा अभियंता यांनी मोजमाप करुन शेतकऱ्यांच्या नावे बिल मिळण्यात यावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) सदर अटी जवाहर योजनेतील नसून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गतच्या सिंचन विहीरीबाबत आहेत.

तसेच अशा प्रकारची मागणी शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेली नसून याबाबत लोकप्रतिनिधींकडून निवेदन प्राप्त झाले आहे. त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोयना धरणातील वीज निर्मितीसाठी लवादाने ठरवून दिलेल्या पाण्यापैकी १० टक्के पाणी सिंचनासाठी आरक्षित करण्याचा प्रस्ताव**

**(८२) * १७७३८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ११४६६ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोयना धरणातील वीज निर्मितीसाठी लवादाने ठरवून दिलेल्या पाण्यापैकी १० टक्के पाणी सिंचनासाठी आरक्षित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे व लवादाने वीज निर्मितीसाठी ठरवून दिलेल्या पाण्यापैकी १० टक्के पाणी सिंचनासाठी आरक्षित करण्याची कारणे काय आहेत,
(३) सदर पाणी आरक्षित केल्यास त्याचा वीज निर्मितीवर परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत व या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) ते (४) अंशत: खरे आहे. कृष्णा पाणी तंटा लवादातील तरतुदीनुसार कोयना धरणातून दरवर्षी विद्युत निर्मितीसाठी जास्तीत जास्त ६७.५ अ.घ.फू. पाणी पश्चिमेकडे वळविण्याची मुभा आहे. मात्र सन २०१५-१६ मध्ये कोयना धरण हे ७४.८१ टक्के भरले होते. त्यामुळे या वर्षी विद्युत

निर्मितीसाठी ५२.५० अ.घ.फू. (पावसाळ्यातील वापर १८.८८ अ.घ.फू. + पावसाळ्यानंतरचा वापर ३३.६२ अ.घ.फू.) इतके पाणी सिमित करुन उर्वरित पाणी पिण्यासाठी व सिंचनासाठी पुर्वेकडे उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे. यामुळे कोयना टप्पा १ ते ४ मधील विद्युत निर्मितीत काही प्रमाणात घट अपेक्षित असली तरीही या वर्षीचे कमी पर्जन्यमान व पुर्वेकडील दुष्काळजन्य परिस्थिती विचारात घेऊन शासनाने वरील प्रमाणे नियोजन केले आहे.

-----------------

**पंचायत समिती, खामगाव (जि.बुलडाणा) अंतर्गत असलेल्या ग्रामसेवकांची रिक्त पदे भरणे बाबत**

**(८३) * १६६१६ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक १२५८१ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती खामगाव (जि.बुलडाणा) अंतर्गत असलेल्या ग्रामसेवकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागा रिक्त असल्यामुळे एका ग्रामसेवकाला ३-३ गावाचा अतिरिक्त प्रभार देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एका ग्रामसेवकाला अतिरिक्त प्रभार दिल्यामुळे त्यांच्या मूळ गावच्या विकास कामास विलंब होत आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना बँकांचे कर्ज काढण्याकरिता शासनाचे व इतर दाखले मिळण्यासाठी त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ग्रामसेवकाच्या परीक्षा पूर्ण होऊनसुद्धा त्यांना नियुक्त्या दिल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

(२), (३) व (४) पंचायत समिती खामगांव अंतर्गत ग्रामसेवकांची एकूण ७ पदे रिक्त आहेत. या ७ पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर ग्रामसेवकांकडे सोपविण्यात आला आहे. मूळ ग्रामपंचायत व एक अतिरिक्त ग्रामपंचायत अशाप्रकारे दोन ग्रामपंचायतीचा प्रभार ७ ग्रामसेवकांकडे सोपविण्यात आला आहे.

ग्रामसेवकांकडून दाखले मिळण्यासाठी त्रास होत असल्याची एकही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५), (६) व (७) दिनांक २ डिसेंबर, २०१५ रोजी बुलडाणा जिल्हा परिषदे अंतर्गत कंत्राटी ग्रामसेवकांच्या रिक्त पदांसाठी परीक्षा घेण्यात आली असून, ११ कंत्राटी ग्रामसेवकांची निवड करुन नियुक्ती दिलेली आहे. या कंत्राटी ग्रामसेवकांना पायाभूत प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यामधून प्राधान्याने पंचायत समिती, खामगांव येथे रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**शिरोडा (ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग) येथील उपजिल्हा रुग्णालयाची दूरवस्था झाल्याबाबत**

**(८४) * १६६५२ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोडा (ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग) येथील कोटयवधी रुपये खर्च करुन शासनाने उपजिल्हा रुग्णालय उभारले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाची दूरवस्था झाली असून तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांसह विविध उपकरणे सुध्दा नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयाचा कारभार पूर्ण क्षमतेने सुरु होण्यासाठी आरोग्य सेवा सुधारणा संघर्ष समितीच्यावतीने दिनांक २५ जानेवारी २०१६ पासून रुग्णालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर उपजिल्हा रुग्णालय त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) आरोग्य सेवा सुधारणा संघर्ष समितीने डॉ. वजराटकर यांची प्रतिनियुक्ती रद्द करावी. ब्लड स्टोअरेज कार्यान्वित करणे आणि डॉक्टर व कर्मचारी यांची नियुक्ती करणे या मागण्यांसाठी रुग्णालयासमोर उपोषण सुरु केले होते.

डॉ. वजराटकर यांची प्रतिनियुक्ती रद्द करण्यात येऊन ते दि. २५.०१.२०१६ पासून शिरोडा येथे हजर झाले आहेत. ब्लड स्टोअरेज रेफ्रिजरेटर डिसेंबर, २०१५ मध्ये पुरविण्यात आले आहेत व वैद्यकीय अधिक्षक, गट-क व गट-ड ची रिक्त पदे भरावयाची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे.

याबाबत उपोषण कर्त्यांशी चर्चा केल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**संजय गांधी राष्ट्रीय उद्‌यानातील जमिनीची हद्द निश्चित करण्याबाबत**

**(८५) * १७९३७ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सन २००० मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्‌यानातील २२० खाजगी जमिनीवर असलेल्या ६९ हजार झोपड्या बुलडोझर फिरवून उध्वस्त करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केवळ बिल्डरांच्या फायद्‌यासाठी वन विभागाने हे कारवाईचे षडयंत्र रचल्याचा आरोप करत घर हक्क जागृती परिषदेने गोरगरीबांच्या घरांसाठी १५ वर्षापासून संघर्ष सुरु ठेवला असून ही २१ हजार कुटूंबे आजही पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही राष्ट्रीय उद्‌यानातील जमिनीची हद्द निश्चित करण्याबाबत शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नसल्यामुळे ६ वर्षापासून जमिनीचे सर्व्हेक्षण रखडलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सरकारी गॅझेट, नोटिफिकेशन, भारतीय वन अधिनियम १९२७ संपादनाची नोटिस बोरीवली तहसिलदारांचा अहवाल व जिल्हाधिकारी कार्यालयातील नोंदीवरुन ही जमीन खाजगी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २००९ मध्ये राष्ट्रीय उद्यान व भोवतालच्या परिसराची विशेष बाब म्हणून नोंदणी करण्याचे आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतरही वन विभागाने सदर परिसरातील खाजगी जमिनीवर उभ्या राहिलेल्या झोपड्यांवर बुलडोझर फिरविल्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याची तसेच संबंधित दोषीविरोधात कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच घरहक्क जागृती परिषदेचे अध्यक्ष यांनी माहे डिसेंबर, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची वनजमीन अतिक्रमणमुक्त करण्यादृष्टीने मा. उच्च न्यायालयांत दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ३०५/९५ मध्ये पारित केलेल्या आदेशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीत असलेल्या वनजमिनीवरील अतिक्रमित झोपडयांचे सन २००० मध्ये निष्कासन करण्यात आले होते. तत्पूर्वी जे अतिक्रमक १.१.१९९५ पूर्वीपासून वनजमिनीवर रहात होते/आहेत व ज्यांनी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रक्कम रु. ७०००/- भरलेल्या एकूण २५१४४ अतिक्रमकांपैकी ११०३० अतिक्रमकांचे उद्यानाबाहेर मौजे चांदिवली पुनर्वसन करण्यात आले आहे. उर्वरित १४११४ अतिक्रमकांचे पुनर्वसन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत मौजे चांदिवली येथे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) मा. उच्च न्यायालयाच्या दि. १५/९/२००३ च्या आदेशाविरुद्ध अतिक्रमकांच्यावतीने तसेच लोकप्रतिनिधींच्यावतीने मा. सर्वोच्च न्यायालयांत सिव्हील अपील दाखल झाले होते. त्यासोबत शासनाच्यावतीने I.A. No. १/२००४ मा. सर्वोच्च न्यायालयांत दाखल करण्यत आला होता. सदर सर्व दाव्यांमध्ये हददीची पुनर्मोजणी करावी, अशी विनंती होती. परंतु सदरचे सर्व अपील व शासनाने दाखल केलेला I.A दि. ८/५/२००९ च्या आदेशात अनधिकृत वास्तव्याबाबत रिट याचिकेद्वारे निर्णय देणे विधीवत नसल्याने याबाबत सक्षम प्राधिकरणाने निर्णय घ्यावा, असे नमुद करुन सिव्हील अपील फेटाळण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे आहे.

तथापि रिट याचिका क्रमांक ३०५/९५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीतीलच वनजमिनीवरील अतिक्रमित झोपडयांच्यासंदर्भात निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे.

(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सातारा व सांगली जिल्हयासाठी कोयना धरणातून**
**२५ टिएमसी पाणी देण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(८६) * १७४२७ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा व सांगली जिल्हयातील संभाव्य पाणी टंचाई सुसह्य करण्यासाठी पाटबंधारे विभागाने कोयना धरणातून २५ टीएमसी पाणी देण्याचा प्रस्ताव शासनाकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) अंशत: खरे आहे. कृष्णा-पाणी तंटा लवादातील तरतुदीनुसार कोयना धरणातून दरवर्षी विद्युत निर्मितीसाठी जास्तीत जास्त ६७.५ अ.घ.फू.पाणी पश्चिमेकडे वळविण्याची मुभा आहे. मात्र सन २०१५-२०१६ मध्ये कोयना धरण हे.७४.८१ टक्के भरले होते. त्यामुळे या वर्षी विद्युत निर्मितीसाठी ५२.५० अ.घ.फू. (पावसाळ्यातील वापर १८.८८ अ.घ.फू. + पावसाळ्यानंतरचा वापर ३३.६२ अ.घ.फू.) इतके पाणी सिमित करुन उर्वरित पाणी पिण्यासाठी व सिंचनासाठी पूर्वेकडे उपलब्ध करुन देणेचे नियोजन आहे. यामुळे कोयना टप्पा १ ते ४ मधील विद्युत निर्मितीत काही प्रमाणात घट अपेक्षित असली तरीही या वर्षीचे कमी पर्जन्यमान व पूर्वेकडील दुष्काळजन्य परिस्थिती विचारात घेऊन शासनाने वरील प्रमाणे नियोजन केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कुपोषण कमी करण्यासाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(८७) * १५२६४ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत देशातील सर्वाधिक कुपोषीत असलेल्या २०० जिल्ह्यांची यादी प्रकाशित झाली असून त्यात महाराष्ट्रातील २० जिल्ह्यांचा समावेश कुपोषित यादीत असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील २० जिल्ह्यांमधील कुपोषण कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कुपोषण कमी करण्यासाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेतील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्रचना या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने वाढविलेल्या रु. १ च्या निधीतून २० जिल्हयामधील ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांची आहारातील कमतरता भरुन काढण्यासाठी नियमित आहाराव्यतिरिक्त अतिरिक्त पौष्टीक मुल्य असलेले खादय पदार्थ, तसेच विविध प्रकारची आरोग्यदायी औषधे इ. चा पुरवठा अंगणवाडीतील लाभार्थींना निधीच्या उपलब्धतेनुसार केला जातो. तसेच लाभार्थ्यांना अंडी, केळीच्या पुरवठयासाठी अंगणवाडीस्तरावर अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले असून सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(३) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील रिक्त पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही केली वा करण्यात येत आहे:-

१) बाल विकास प्रकल्प अधिकारी वर्ग-२ या पदाची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत १४६ पदांची जाहिरात प्रसिध्द करुन त्यासाठी लेखी परिक्षा सुध्दा घेण्यात आली आहे.

२) मुख्यसेविका वर्ग-३ (शहरी प्रकल्प) हे पद भरण्याकरीता बिंदुनामावली

अंतिम करण्याचे काम सुरु करण्यात आले होते. तथापि मागील मुख्य सेविका भरती २००९ मध्ये झालेल्या अनियमिततेमुळे मुख्यसेविकांचे काही दावे मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई तसेच मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे सुरु असल्याने बिंदुनामावली अंतिम करण्यात आलेली नाही. सदर प्रकरणी मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३) अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची पदे तात्काळ भरण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन प्रकल्पावरील बंदी उठवण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(८८) * १६३०६ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११८४३ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी - मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने १८.३३ अ.घ.फुट पाणी वापराचे नियोजन करून त्यास शासनाने तत्वत: मान्यता प्रदान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी रु.५३७.३७ कोटी किंमतीचे व ८६९६ हेक्टर सिंचन क्षमतेचे २६ प्रकल्प हाती घेण्यास मान्यता देणेबाबत मा.राज्यपाल यांना दिनांक ५ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली असून सदरील मान्यता प्रतिक्षाधीन आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त कामाचे प्रतिक्षाधीन प्रस्तावास मान्यता प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, प्रस्तुत प्रतिक्षाधीन प्रस्तावास मान्यता केव्हापर्यंत मिळणे अपेक्षित आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) मराठवाड्यातील टंचाईग्रस्त व आदिवासी भागाकरिता सिंचनाची सोय उपलब्ध करण्यासाठी मा.राज्यपाल महोदयांच्या सन २०१४-१५ च्या निदेशान्वये प्रस्तावित २६ प्रकल्प हाती घेण्यास मान्यता देण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी त्यांचे दि.१९ जानेवारी, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मा. राज्यपाल महोदयांना पुन:श्च विनंती करण्यात आली आहे.

मा. राज्यपाल यांचेकडून अद्याप मान्यता प्राप्त नाही.

-----------------

**गोसीखुर्द सिंचन प्रकल्पाची जमीन अधिग्रहण व पुनर्वसन कामे पुर्ण करण्याबाबत**

**(८९) * १४७४५ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील गोसीखुर्द सिंचन प्रकल्पाची जमीन अधीग्रहण व पुनर्वसन कामासाठी २४० कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन सदर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी दिल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोसीखुर्द सिंचन प्रकल्पाची जमीन अधीग्रहण व पुनर्वसनाची कामे पुर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) दिनांक ५ जानेवारी, २०१६ च्या शासन पत्रान्वये गोसीखुर्द प्रकल्पासाठी ३५० कोटी एवढा अतिरिक्त निधी मंजूर केलेला आहे.

(२) महसूल विभाग शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ नुसार प्रकल्पास आवश्यक जमिनीचे अधिग्रहण सरळ खरेदीने करण्याबाबत जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीकडून मुल्यांकन करून घेऊन सरळ खरेदीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. तसेच पुनर्वसन कामांच्या दुरस्तीसाठी रु.७.५२ कोटीच्या प्रस्तावास शासन स्तरावरून मान्यता प्रदान केलेली आहे. संपादित केलेल्या जमीनीनुसार प्रकल्पाची कामे तसेच पुनर्वसनाच्या दुरुस्तीची कामे सुरु करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------------------------

**लाठीपाडा (ता.साक्री, जि.धुळे) धरणाच्या उजव्या कालव्याचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(९०) * १६१२४ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाठीपाडा (ता.साक्री, जि.धुळे) धरणाच्या उजव्या कालव्याचे काम बऱ्याच वर्षापासून रखडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी अभावी हे काम रखडले असल्याने या कामासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशतः खरे आहे.

पांझरा मध्यम प्रकल्पाच्या (लाठीपाडा प्रकल्प) वाढीव कालवा कि.मी. २१ ते २८ ची कामे व वितरीका क्र.१७ ची कामे विस्तार सुधारणा लेखाशिर्ष अंतर्गत पुर्ण झालेली आहेत. वितरीका क्र.१८ ते २२ ची कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

(२) वितरीका क्र.१८ ते २२ मधील कामास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार कामे पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड जिल्हयातील गोदावरी नदीच्या पात्रातील बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रातील कामात सुसंगतपणा येण्यासाठी सदरची कामे एकाच कार्यालयाकडे वर्ग करण्याबाबत**

**(९१) * १५९५९ श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी नदीच्या पात्रात बीड जिल्हयाच्या हद्दीवर उच्च पातळी आणि कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांची कामे करण्यात आली असुन बंधाऱ्यांच्या बुडीत क्षेत्रातील कामे व भुसंपादन मावेजा आदी कामे अपुर्ण आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुडीत क्षेत्रातील कामे आणि भुसंपादन मावेजा बाबत शेतकरी सातत्याने संबंधित कार्यालयाकडे पाठपुरावा करत आहेत, परंतू ही कार्यालये वेगवेगळया ठिकाणी असल्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा त्रास होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोदावरी नदीवरील बंधाऱ्यांची कामे कोणकोणत्या कार्यकारी अभियंता व अधिक्षक अभियंता यांच्या कार्यालयाच्या अधिनस्त आहेत,

(४) असल्यास, या कामात सुसंगतपणा येण्यासाठी व शेतकऱ्यांना सुलभ होईल या करिता सदरची कामे एकाच कार्यालयाकडे वर्ग करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा. मंत्री जलसंपदा यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, अंशत: खरे आहे.

गोदावरी नदीच्या पात्रात बीड जिल्ह्याच्या हद्दीपर्यंत ८ उच्च पातळी बंधाऱ्यांच्या बुडीत क्षेत्रात एकूण ५६ पूलांची कामे आहेत. यापैकी २४ पूलांची कामे पूर्ण झाली असून २२ पुलांची आहेत. यापैकी २४ पूलांची कामे पूर्ण झाली असून २२ पुलांची कामे प्रगती पथावर आहेत व १० पूलांची कामे अंदाजपत्रक स्तरावर आहेत.

उपरोक्त ८ उच्च पातळी बंधारे व १ को. प. बंधाऱ्यासाठी एकूण १९४.३७ हेक्टर क्षेत्र संपादित करणे आवश्यक आहे. यापैकी १०५.८२ हेक्टर क्षेत्र संपादीत करण्यात आलेले आहे व ८८.५५ हेक्टर क्षेत्र संपादन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३) गोदावरी नदीवरील बंधाऱ्यांची कामे खालीलप्रमाणे कार्यालयाच्या अधीनस्त आहेत.

| अ.क्र. | बंधाऱ्यांचे नाव | विभाग | मंडळ |
|---|---|---|---|
| १ | आपेगाव, उ.पा.बं. | ल.पा.वि.क्र.१, औरंगाबाद | औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद |
| २ | हिरडपुरी, उ.पा.बं. | ल.पा.वि.क्र.१, औरंगाबाद | |
| ३ | पाथरवाला, को.प.बं. | जा.ल.पा.वि.जालना | |
| ४ | जोगलादेवी, उ.पा.बं. | नां.म.का.वि.क्र.२, मु.औरंगाबाद | |
| ५ | मंगरुळ, उ.पा.बं. | नां.म.का.वि.क्र.२, मु.औरंगाबाद | |
| ६ | राजाटाकळी, उ.पा.बं. | नां.म.का.वि.क्र.२, मु.औरंगाबाद | |
| ७ | लोणीसावंग, उ.पा.बं. | नां.म.का.वि.क्र.२, मु.औरंगाबाद | |
| ८ | ढालेगाव, उ.पा.बं. | ल.पा.विभाग, परभणी | नांदेड पाटबंधारे मंडळ नांदेड |
| ९ | तारुगव्हाण, उ.पा.बं. | ल.पा.विभाग, परभणी | |

(४) होय.

(५) काम पूर्ण झालेले ६ उच्च पातळी बंधारे लाभक्षेत्र विकास प्राधिकरण औरंगाबाद यांचेकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही प्रगत आहे. तसेच बांधकामाधीन बंधाऱ्यांची कामे पूर्ण झालेनंतर तीसुध्दा लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांचेकडे हस्तांतरीत करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्ह्यातील वांद्री प्रकल्पाचे पाणी दुबार पिकासाठी देण्याबाबत**

**(९२) * १७४६५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील पाटबंधारे विभागामार्फत सिंचनासाठी बांधलेल्या वांद्री प्रकल्पाचे पाणी दुबार पिकासाठी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये सोडण्यात येईल असे आश्वासन प्रकल्प अधिकाऱ्यांनी दिले असूनही शेतीसाठी पाणी सोडण्यात आले नसल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

"कोकण सिंचन हंगाम २०१५-२०१६" साठी दिनांक १७/१२/२०१५ पासून वांद्री प्रकल्पातील सिंचन आवर्तने सुरु करण्यात आली असून आजमितीस नियमित आवर्तने सुरू आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वडवणी व धारुर तालुक्यातील (जि.बीड) पहाडी पारगाव येथील वनविभाग कार्यालयाची दूरवस्था झाल्याबाबत**

**(९३) * १६१७१ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडवणी व धारुर तालुक्यातील (जि.बीड) निसर्गाची जोपासना करण्याकरिता पहाडी पारगाव येथे वनविभागाचे लाखो रुपये खर्चून बांधलेल्या कार्यालयाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारभार चालवण्याकरिता वनविभागाचे २ वनरक्षक, २ बीट व १ वनपाल यांच्यावर जबाबदारी दिली आहे, हे ही खरे आहे का,

(३) असल्यास, सदर ठिकाणी शेकडो वृक्षांची तोड होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, दि.२८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास वन कार्यालयात जुगार सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर कार्यालयातील बेजबाबदार कर्मचा-यांवर व वृक्ष तोड करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) धारुर तालुक्यातील (जि.बीड) पहाडी पारगाव येथे वन विभागाचे कार्यालय नसून, वनरक्षकाचे निवासस्थान आहे. त्याचे बांधकाम सन १९९७ या वर्षात झालेले असून, त्यावर रु.१,८४,५६१/- खर्च झालेला आहे. सद्य:स्थितीत निवासस्थान नादुरुस्त आहे.

(२) वडवली व धारुर तालुक्यातील वनक्षेत्र हे वनक्षेत्रपाल, धारुर यांच्या नियंत्रणाखाली असून वडवणी तालुक्यात २-बिट व धारुर तालुक्यात ८-बिट असू एकूण १०-बिट वनरक्षक व त्यांच्या नियंत्रणासाठी २-वनपाल यांच्यावर संरक्षणाची जबाबदारी आहे.

(३) हे खरे नाही.

मागील ३ वर्षात फक्त काशिदचे १ वृक्षतोड व ४ मोळ्यांची तोड झालेली आहे. अवैध वृक्षतोड करणाऱ्यांकडून रु.११००/- नुकसान भरपाई वसूल करण्यात आलेली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि "जनस्वास्थ अभियान" च्या वतीने मुंबईतील देवनार येथील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेने जनसुनावणी आयोजित केल्याबाबत**

**(९४) * १४६९७ श्री.विजय उर्फ भाई गिरकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अनंत गाडगीळ, श्री.महादेव जानकर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवेची स्थिती समाधानकारक नाही, ग्रामीण भागात पुरेशी प्राथमिक आरोग्य केंद्र नाहीत, डॉक्टरही नाहीत, प्राथमिक सुविधा, औषधांची कमतरता आहे. सफाई कामगार प्रसूतीची कामे करतात, पेशंटला उध्दट वागणूक मिळते असे निरिक्षण केंद्रीय मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष यांनी मुंबईत नोंदविले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि "जनस्वास्थ अभियान" च्या वतीने मुंबईतील देवनार येथील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेने माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात जनसुनावणी आयोजित केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जनसुनावणीत राज्यातील सार्वजनिक आरोग्य संबंधी मानवाधिकार आयोगाने कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(४) सदर आयोगाच्या शिफारशीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व सदरहू शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

दिनांक ०६ व ०७ जानेवारी, २०१६ रोजी राष्ट्रीय मानवाधिकार आयोग यांचे मार्फत टाटा सामाजिक विज्ञान संस्थेत "जनस्वास्थ अभियान" च्या वतीने दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांची सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

(३) सदर सुनावणीचे लेखी निर्णय व इतिवृत्त राष्ट्रीय मानवाधिकार आयोग यांचेकडून अद्याप अप्राप्त आहेत.
(४) सदर सुनावणीचे निर्णय व इतिवृत्त राष्ट्रीय मानवाधिकार आयोग यांचेकडून प्राप्त होताच आयोगाच्य शिफारशीवर त्वरीत अंमलबजावणी करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे भिनार (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाने गैरव्यवहार केल्याबाबत**

**(९५) * १८०७६ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भिनार (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाने गैरव्यवहार केल्याच्या विरोधात ग्रामपंचायतीच्या कार्यालयास कुलूप लावण्याची घटना दि. २५ जानेवारी, २०१६ रोजी वा च्या दरम्यान घडल्याची निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पदाधिकाऱ्यांनी व ग्रामस्थांनी ग्रामसेवकाबाबत कोणकोणत्या प्रकारचे आक्षेप घेतले आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय. ग्रामपंचायतीला कुलुप लावण्याची घटना दि. २१.१.२०१६ रोजी घडली असून सदर बाब दि. २२.१.२०१६ रोजी निदर्शनास आली आहे.
(२) पदाधिकारी व ग्रामस्थांनी ग्रामसेवकावर मनमानी कारभार करणे, खर्चाची व प्रोसीडींग बुकची माहिती न देणे, अनधिकृत बांधकामावर कार्यवाही न करणे, ग्रामपंचायतीचा निधी खात्यातून परस्पर काढणे व त्याची माहिती सरपंचांना न देणे, दुरुस्ती व बोगस कागदपत्रे दाखवून पाणीपुरवठा खात्यातून परस्पर निधी काढणे आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना माहिती मागणी करुनही न देणे इत्यादी आक्षेप घेतले आहेत.
(३) व (४) होय. भिवंडी येथील विस्तार अधिकारी यांनी केलेल्या तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटींनुसार संबंधित तत्कालीन ग्रामसेवकांविरुद्ध प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## ग्रामीण भागात पायाभुत सुविधा पुरविण्यासाठी श्यामप्रसाद मुखर्जी रुरबन अभियान योजना राबविण्याबाबत

**(९६) * १५३८९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील गाव समुहांचा आर्थिक, सामाजिक आणि भौतिक विकास करण्यासह त्यांना शहरांप्रमाणे पायाभुत सुविधा पुरविण्यासाठी श्यामप्रसाद मुखर्जी रुरबन अभियान योजना राबविण्याचा निर्णय दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, यासाठी किती निधीची आवश्यकता आहे,

(४) असल्यास, निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

(२) ग्रामीण भागातील गावांच्या समुहांचा आर्थिक, सामाजिक आणि भौतिक विकास करणे आणि शहराप्रमाणे पायाभूत सुविधा पुरविणे अपेक्षित आहे.

(३) रुरबन अभियान अंतर्गत निवडण्यात आलेल्या गाव समुहांचा विकासासाठीचा सर्व निधी राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनेतून एककेंद्राभिमुखता (Convergence) द्वारे प्राप्त होणार आहे. तसेच याशिवाय आवश्यकतेप्रमाणे विविध प्रकल्पांवर केंद्र शासनाच्या "उणीवा निवारण निधी" (Critical Gap Funding) मधून निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

(४) केंद्र शासनाने दिलेल्या निदेशानुसार एकूण ७ (बिगर आदिवासी - ६+आदिवासी-१) गाव समुहांचे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मधुमेह आणि उच्च रक्त दाबाच्या रुग्णांना स्वाईन फ्लु प्रतिबंधक लस उपलब्ध करण्याबाबत

**(९७) * १५५१६ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मधुमेह आणि उच्च रक्तदाबाच्या रुग्णांना स्वाईन फ्लु प्रतिबंधक लसीपासून दूर राहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ७६ केंद्रामधून अवघ्या ७५० रुग्णांपर्यंत ही लस पोहचली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही लस या रुग्णांपर्यंत पोहचविण्यासाठी शासनाने जनजागृतीचे मोहीम हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

ऐच्छिक व मोफत फ्लु लसीकरण मोहिम दिनांक २० जुलै, २०१५ रोजी सुरू करण्यात आली असू स्वाईन फ्लु प्रतिबंधक लसीकरणासठी दिनांक २० जुलै, २०१५ ते २९ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत राज्यात १४४ लसीकरण केंद्रे कार्यरत होती. सदरहू केंद्रावर मधुमेह आणि उच्च रक्तदाबाच्या २६६३ रुग्णांसह एकूण ४८,७९९ व्यक्तींचे लसीकरण करण्यात आले आहे.

(३) लसीकरण मोहिमेस जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळण्याकरिता आरोग्य शिक्षण मोहिम सुरु करण्यात आली आहे.

फ्लु लसीकरण मोहिमेअंतर्गत जनजागृतीसाठी २०,००० बॅनर्स, २५,००० पोस्टर्स व ८५,५०० हस्तपत्रिका वितरित करण्यात आल्या आहेत. तसेच राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये होर्डींग लावण्यात आले आहेत.

फ्लु लसीकरण मोहिमेसंदर्भात राज्यातील प्रमुख टि.व्ही. चॅनल्स, रेडिओ, झिंगल यांच्या माध्यमातून देखील प्रसार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत झालेल्या कामांच्या लेखापरिक्षणाबाबत

**(९८) * १५६९३ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील जलयुक्त शिवार योजने अंतर्गत जिल्हयातील २०० गावांमध्ये सात हजारांहून अधिक कामे करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेंतर्गत जिल्हयात मोठया प्रमाणावर झालेल्या कामांचे लेखापरिक्षण त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात येणार असून या कामांमध्ये गंभीर चुका आढळून आल्यास संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्हयात झालेल्या जलयुक्त शिवार योजने अंतर्गत झालेल्या कामांचे लेखापरिक्षण करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, जलयुक्त शिवारांच्या कामांत गंभीर चुका आढळणाऱ्या ठेकेदार व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

जानेवारी अखेर पुणे जिल्हयातील २०० गावांमध्ये ४४३३ कामे हाती घेण्यात आलेली आहेत. त्यापैकी ३३४६ कामे पूर्ण झालेली असून ११२७ कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामांवर रु. ८५.६९ कोटी खर्च झालेला आहे.

(२) व (३) अद्याप लेखा परिक्षण करण्यात आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौ.कोलंबी (ता.नायगाव, जि.नांदेड) येथे गॅस्ट्रोची साथ पसरल्याबाबत**

**(९९) * १५०६२ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.कोलंबी (ता.नायगाव, जि.नांदेड) येथे पाणी टंचाईमुळे टँकरने पाणी पुरवठा केला जात असून सदर दुषित पाण्यामुळे गॅस्ट्रोची साथ पसरलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गॅस्ट्रोच्या साथीवर उपाय योजना केली नसल्यामुळे जवळपास ४० ते ५० लोकांना गॅस्टोची लागण झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर साथीवर प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही

या गावात गॅस्ट्रोचे ४० इतके रुग्ण आढळले असून त्यांना वेळेवर दिलेल्या उपचारामुळे या साथीत कोणाचाही मृत्यु झालेला नाही. तसेच, सदर साथ १६/०१/२०१६ रोजी संपुष्टात आली.

(३) प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना:-

- रुग्णांचे सर्व्हेक्षण
- रुग्णोपचारासाठी गावात विशेष कक्ष.
- पाणी स्त्रोताभोवतीचे स्वच्छता.
- नियमित पाणी शुध्दीकरण.
- आरोग्य शिक्षण

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नदीसोबत लोकचळवळ उभारुन जीवन वाहिन्यांचे आयुष्य वाढविण्याबाबत**

**(१००) * १६९४० श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील नद्या एकमेकांशी जोडल्यास कोणताही विकास होणार नाही उलट देशाचे तुकडे होतील त्यापेक्षा नदीसोबत लोकचळवळ उभारुन या जीवन वाहिन्यांचे आयुष्य वाढवावे, असे स्पष्ट प्रतिपादन रॅमन मॅगसेस आणि जलक्षेत्रातील नोबेल पुरस्कार प्राप्त डॉ.राजेंद्र सिंह यांनी दि. १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नदी/ओढा/नाल्यामधील गाळ काढणे, सरळीकरण व खोलीकरण करणे हि कामे लोकसहभागातून करुन नदी/ओढा/नाला पुनर्जीवन करण्यास ज्या गावातील रहिवाशांनी पुढाकार घेऊन लोकवर्गणी/ श्रमदानाद्वारे मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे किंवा देत आहेत, अशा गावांमध्ये घेण्यात आलेल्या नदी/ओढा/नाला पुनर्जीवन कार्यक्रमास प्रोत्साहन देण्यासाठी अभिसरणाच्या माध्यमातून नदी पुनर्जीवन कार्यक्रम राबविण्यास शासन निर्णय दिनांक ८ डिसेंबर, २०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

नदी पुनर्जीवन कार्यक्रमात नद्यांची निवड करण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सादरीकरण करण्याचे आवाहन करण्यात आले. त्यानुसार आतापर्यंत १२ जिल्हयातील ८६ नदी/नाल्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून साखळी सिमेंट नाला बांधासाठी रु. २२३१.११४ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**श्रीगोंदा, कर्जत (जि.नगर) व शिरुर (जि.पुणे) या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार कुकडी प्रकल्पातून घोड धरणात पाणी सोडण्याबाबत**

**(१०१) * १५६६८ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा, कर्जत (जि.नगर) व शिरुर (जि.पुणे) या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार कुकडी प्रकल्पातून घोड धरणात २४ दशलक्ष घनमीटर ८०.८५ टीएमसी पाणी सोडण्याचे आदेश महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरणाने दिल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदशर्नास आले आहे,

(२) असल्यास, प्राधिकरणाच्या या आदेशानुसार कुकडी प्रकल्पातील घोड धरणात पाणी सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) कुकडी प्रकल्पातून घोड धरणात २४ दलघमी (०.८५ टीएमसी) पाणी सोडण्याचे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मुंबई यांनी दिनांक ०५.०१.२०१६ रोजी आदेश दिले होते. (वडज धरणातून १४ दलघमी+डिंबे धरणातून १० दलघमी) त्यानुसार वडज धरणातून दिनांक १५/१/२०१६ ते २४/१/१६ दरम्यान १२.८९ दलघमी पाणी घोड धरणात सोडण्यात आले. दरम्यान मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २५.०१.२०१६ रोजी कुकडी प्रकल्पातून पाणी सोडण्याच्या निर्णयास स्थगिती दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्हयातील मोतिबिंदू शस्त्रक्रियेचे उद्दिष्ट वाढविण्याबाबत**

**(१०२) * १५५४७ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील नॅब व लायन्स आय हॉस्पीटलमध्ये वर्षभरात सुमारे ४ हजाराहून अधिक मोतीबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रमांतर्गत होत असतांना यापुढे केवळ ५०० शस्त्रक्रिया एवढे मर्यादीत उद्दिष्ट रत्नागिरी जिल्हयात देण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेचे उद्दीष्ट वाढवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

रत्नागिरी जिल्हयात एकूण ११६१० मोतीबिंदू शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट दिले आहे. त्यापैकी रत्नागिरी जिल्हयातील अशासकीय संस्थांना ५०० मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट दिले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गौडगाव (ता.बार्शी, जि.सोलापूर) येथील तलावासाठी भूसंपादन केलेल्या शेतकऱ्याला मोबदला देण्याबाबत**

**(१०३) * १५५२७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गौडगाव (ता.बार्शी, जि.सोलापूर) येथील शेतकऱ्याने सन १९७२ मध्ये तलावासाठी भूसंपादन करण्यात आलेल्या जमिनीच्या मोबदल्यापोटी दाखल केलेल्या दाव्यात न्यायालयाने आदेश देऊन १० वर्षे पाठपुरावा करूनही त्यास मोबदला न मिळाल्याने त्याने न्यायालयाच्या आदेशानुसार लघु पाटबंधारे विभागांतर्गत येणाऱ्या लघु पाटबंधारे विभाग क्र. १ येथील कार्यालयातील खुर्च्या, फर्निचर असे साहित्य जप्त केले असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्याला मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) याबाबत तात्काळ उपाययोजना करण्याचे निदेश जिल्हाधिकारी, सोलापूर यांना देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

--------------------------

**गडचिरोली जिल्हयात रुग्णवाहिका सेवा सुरु करण्याबाबत**

**(१०४) * १५२१९ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामान्य नागरिकांना त्वरित रुग्णसेवा मिळणेकरिता १०८ नंबर वरुन रुग्णवाहिकेची सेवा सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम नक्षल प्रभावित जिल्हा असून सर्वसामान्य जनता केवळ शासकीय वैद्यकीय सेवेवर अवलंबून आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या जिल्हयात बहुतांश तालुक्यातील अंतर लांब असल्यामुळे १०८ नंबर वरील सेवा या जिल्हयाला आवश्यक असूनही या जिल्हयात केवळ २ रुग्णवाहिका देण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या अतिदुर्गम नक्षल प्रभावित जिल्हयात प्रत्येक तालुक्याकरिता रुग्णवाहिका देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) या जिल्हयात केवळ २ रुग्णवाहीका देण्यात आल्या हे खरे नाही तथापि गडचिरोली जिल्हयासाठी एकूण ९ रुग्णवाहीका उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यांच्या मार्फत आतापर्यंत ६०७३ एवढया रुग्णांना मोफत संदर्भ सेवा देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परळ (मुंबई) येथील महात्मा गांधी मेमोरियल रुग्णालयाच्या तळमजल्यावर लागलेल्या आगीत भंगार सामान जळून नष्ट झाल्याबाबत**

**(१०५) * १५४८१ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ (मुंबई) येथील महात्मा गांधी मेमोरियल रुग्णालयाच्या तळमजल्यावर लागलेल्या आगीत भंगार खोलीतील सामान जळून नष्ट झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय हे खरे आहे.

दि. ४/०१/२०१६ रोजी महात्मा गांधी स्मारक रुग्णालय परेल मुंबई येथे तळमजल्यावर लागलेल्या आगीत रुग्णालयातील बऱ्याच वर्षे पूर्वीचा अनुपयोगी जुना अभिलेख जळून नष्ट झाला आहे. मात्र या आगीत आर्थिक अथवा कोणतीही जिवित हानी झालेली नाही. तसेच रुग्णसेवेमध्ये सुध्दा बाधा आलेली नाही.

(२) होय.

या प्रकरणी चौकशी करण्याकरीता आयुक्त, राज्य कामगार विमा योजना मुंबई यांचे कार्यालयामार्फत त्रिस्तरिय समिती गठीत करण्यात आली आहे. या समिती मार्फत चौकशी करुन अहवाल सादर करण्यात आला आहे. तथापि अग्निशामक दलाचा अहवाल अद्याप प्रतिक्षेत आहे. भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी योग्य खबरदारी घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बाबुळगाव तालुक्यातील (जि. यवतमाळ) खर्डा प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(१०६) * १४६४० श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाबुळगाव तालुक्यातील (जि.यवतमाळ) खर्डा प्रकल्पास सन २००७ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००७ मध्ये मान्यता मिळालेल्या खर्डा प्रकल्पाला पूर्ण होण्यास विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खर्डा प्रकल्पात ३०० हेक्टर जमीन पाण्याखाली जाणार असल्यामुळे सदर प्रकल्पामधून ११७५ हेक्टर सिंचन होणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) सदर प्रकल्पास डिसेंबर २००६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र ३८१ हे. असुन प्रकल्पामधुन ११७५ हे. सिंचन होणार आहे.

(४) प्रकल्पासाठी आवश्यक ३९.४५ हेक्टर वनजमीन संपादन तसेच पुनर्वसन आराखडयास मान्यता मिळण्याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील जलयुक्त शिवार योजनेस निधी मिळणेबाबत**

**(१०७) * १५४९० श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात सुरु असलेल्या जलयुक्त शिवारात आतापर्यंत ग्रामीण भागाला केंद्रबिंदू मानून निधी वितरीत केला जात होता मात्र यातील नियमांना शिथिल करुन राज्यातील क वर्गातील नगरपालिकांना देखील या योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन दिला जाणार असल्याची माहिती मा.महसूल मंत्री यांनी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप कशा प्रकारचे आहे,
(३) असल्यास, सदरची योजना शासन केव्हापासून सुरु करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

मा.मंत्री महसूल व मा. मुख्यमंत्री यांनी जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नागरी क्षेत्रात येणाऱ्या नद्या/ओढे यांचे खोलीकरण/ रुंदीकरण आणि इतर बाबींचा समावेश करण्यात येईल अशी माहिती दिली आहे.

(२) व (३) या संदर्भात सर्व विभागीय आयुक्तांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे सुजातपूर (ता.खामगाव, जि. बुलडाणा) राष्ट्रीय महामार्ग क्र.६ या रस्त्याशी जोडणेबाबत

**(१०८) * १६६१९ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सुजातपूर (ता. खामगाव जि. बुलडाणा) हे राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ पासून हाकेच्या अंतरावर असून मुख्य रस्त्याशी जोडलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. ०३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास संबंधीत विभागाशी पत्र व्यवहार करून हे गाव मुख्य रस्त्याशी जोडण्यात यावे अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्ता करण्याबाबत जि.प. बांधकाम विभाग यांनी असमर्थता दाखवली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत विशेष बाब म्हणून हे गाव मुख्य रस्त्याशी जोडण्याचे आदेश तात्काळ देण्यात येणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) मौजे सुजातपूर हे गाव मुख्य रस्त्याशी जोडणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन जिल्हा परिषदेकडे प्राप्त आहे.

लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ज्ञानगंगा प्रकल्पाच्या वितरीकेचा सेवापाथ पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत असून सेवापथावर काम करण्यास परवानगी मिळणेचा प्रस्ताव पाटबंधारे विभागाकडे जिल्हा परिषदेकडील पत्र दिनांक ९.१०.२०१५ अन्वये पाठविला असुन दिनांक २८.१.२०१६ च्या पत्रान्वये स्मरणपत्र दिले आहे.

याबाबत जिल्हा परिषदेकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.